CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : १ सोमवार दि. २६ डिसेंबर २०२२ ते रविवार दि. ०१ जानेवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## दगडावर आपटून मुलाची हत्या केली खुनी बापाला जन्मठेपेची शिक्षा झाली

नागपूर/क्राईम रिपोर्टर

आजवर मुलगी झाली म्हणून लोकांना दुःख व्हायचे आणि जन्मदाते आई-वडिलाच त्या मुलीचा जीव घ्यायचे. पण नागपुरात एका इसमाला मुलगी हवी होती, पण त्याच्या पत्नीने मुलाला जन्म दिला. त्यामुळे तो पिता इतका चिडला कि त्याने मुलाला दगडावर आपटून मारले. या प्रकरणी न्यायालयाने आरोपी बापाला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.

देशात आज कितीही स्त्री-पुरुष समानेबाबत भाषणं केली जात असली तरी काही प्रमाणात जुन्या विचारांचा पगडा ...पान २ वर

## पिता-पुत्राचे नाते रक्ताच्या सड्यात वाहून गेले दारुड्या बापाचे मुलानेच ३० तुकडे तुकडे केले



आरोपी विठ्ठल

मयत परशुराम

कर्नाटक (मुधोळ)/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस हा कुटुंबाच्या डोक्याला ताप ठरलेला असतो. अशा माणसामुळे घराचे घरपण हरवते. कारण दारूच्या नशेत तो रोज घरात येऊन कुठल्या न कुठल्या कारणावरून भांडण करीत असतो. मुलाबाळांना शिव्या घालीत असतो. मारझोड करीत असतो. त्यामुळे अशा माणसा विषयी कुटुंबातील लोकांच्या मनात प्रचंड संताप असतो. उलट त्याला जो त्रास झालेला असतो त्या त्रासाने त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण झालेली असते आणि सुडाने पेटलेला असा माणूस किती क्रूर बनू शकतो हे कर्नाटकातील मुधोळमध्ये बघायला मिळाले. रोज दारू पिऊन तमाशा करणाऱ्या परशुराम कुळली याला घरातील सर्व लोक कंटाळले होते. तर त्याची मुले परशुरामच्या जीवावर उठली होती. बापाविषयी त्यांच्या मनात इतका संताप होता कि याच संतापाच्या भारत एके दिवशी उसाला पाणी घालण्यावरून झालेल्या भांडणात परशुरामचा धाकटा मुलगा विठ्ठल इतका चिडला कि त्याने बापाच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून त्याची हत्या केली. विठ्ठल एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने बापाचा मृतदेह गोणीत भरून उसाच्या शेतात नेला आणि बापाच्या मृतदेहाचे ३० तुकडे करून ते तुकडे त्याने कुपनलीकेत टाकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलगा विठ्ठल याला अटक केली असून त्याने आपला गुन्हा कबुल केला आहे. मुलाचे हे कृत्य समर्थनीय नाही, पण माणसाच्या मनात राग साठत गेला कि त्याच्या संतापाचा स्फोट होऊन तो काय करू शकतो याचे उदाहरण देणारी हि घटना आहे.

मुधोळ जवळील मंटुर येथे परशुराम कुळली हे आपली पत्नी सरस्वती, मुलगा आनंद आणि विठ्ठलसह राहयला आहेत. त्याच्या घरची परिस्थीती ही तशी सधनच आहे. घरची बागयती शेती असल्याने उत्पन्न ही समाधानकारक होते. दोन्ही मुले मोठी झाल्याने परशुराम हे तसे सध्या निवांत होते. त्याचा वेळ जात नव्हता. तसे ते सुरूवातीपासून काही ही कामधंदा करीत नव्हते. सर्व काही काम ते आपल्या घरच्या लोकांना सांगून आपण मात्र आयते खात होते. कसा बसा त्याचा दिवस जात होता. शेतीच्या उत्पन्नातून हातात पैसा खेळू लागल्याने गेल्या काही वर्षापासून ते दारूच्या व्यसनाच्या आहारी गेले होते. अलिकडे तर ते दारू जास्तच पित होते. दारू पिऊन येवून ते घरात बायकोबरोबर मुलांच्याबरोबर विनाकारण भांडण काढत होते. काही तरी कामाचे खेकटे काढयाचे आणि बायकोला आणि मुलांना शिव्या दयायचे एवढयाच त्यांचा उदयोग बनला होता.त्यामुळे घरचे लोक त्याच्या त्रासाला खरे तर वैतागलेले होते. त्यांचा धाकटा मुलगा विठ्ठल हा भांडणात कायम वडिल परशुरामच्या अंगावर मारायला जात होता. त्याला राग सहन होत नव्हता. त्याचा रागीट स्वभाव असल्याने तो वडिलांना शिव्या देत तु काही काम करीत नाहीस उलट आम्हाला कामाला लावून तु निवांत राहतोस दारू पिवून दंगा करतोस असे म्हणत वडिलांना मारायला जायचा. वडिल आणि मुलाच्या भांडणात सरस्वती पडायची. त्यावेळी तिची गोची होत होती. नेमकी कोणाची बाजु घेऊन बोलायचे असा तिला प्रश्न पडयाचा. ...पान २ वर

## विकृतीची त्याच्या परिसीमा झाली दुष्कृत्यानंतर त्याने बालहत्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर



दुर्दैवी लोकेश

वासनेने वखवखलेले लोक हे विकृत असतात. पुढे त्यांची हि विकृती वाढत जाते आणि त्यातूनच त्यांना नैसर्गिक सुखापेक्षा अनैसर्गिक सुखाची चटक लागते आणि अशी चातक लागलेले लांडगे कोवळ्या मुलांची शिकार करीत असतात मनमाड मध्ये अशाच एका घटनेत एका विकृत तरुणाने ९ वर्षांच्या ओळखीच्या बालकाला फूस लावून अज्ञात स्थळी नेले आणि त्याच्याशी अनैसर्गिक कृत्य केले. त्यानंतर आपले हे पाप लपवण्यासाठी त्याने त्या मुलाची हत्या केली. इतकेच नव्हे तर करवतीने त्याने त्या मुलाचा हात आणि करंगळी सुद्धा कापली. मात्र पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्या विकृत आरोपीच्या मुसक्या आवळल्या.





नाशिक जिल्ह्यातील मनमाड आणि मालेगाव ही दोन्ही संवेदनशिल शहरे समजली जातात. रेल्वे आणि गुन्हेगारीच्या दृष्टीने देखील मनमाड या शहराला एक महत्व आहे. नाशिक ग्रामीण पोलिस दलात मालेगाव हे एक स्वतंत्र परिमंडळ आहे. अतिरिक्त पोलिस अधिक्षकांच्या अधिपत्याखाली या परिमंडळात मनमाड उप विभागीय कार्यालयाचा समावेश आहे. त्यामुळे मालेगावसह मनमाड या दोन्ही संवेदनशिल ठिकाणी चालणाऱ्या गुन्हेगारीवर पोलिस दलाचे नियंत्रण असते. या नियंत्रणातून गुन्हेगारीवर अंकुश ठेवला जातो. काही दिवसांपुर्वी मनमाड या गावी एका नऊ वर्षाच्या बालकाची डोक्यात दगडाचे घाव घालून निर्घृण हत्या करण्यात आली. हा प्रकार केवळ हत्येवरच थांबला नाही तर हत्येनंतर त्या बालकाचा हात करवतीने कापण्यात आल्याचे उघड झाले. त्यानंतर त्या बालकाची करंगळी देखील करवतीने कापण्यात आली. मनमाड शहरातील नेहरु भवन परिसरात ...पान २ वर

## रक्तात रंगली त्यांच्या संसाराची स्टोरी पतीने तोडली पत्नीच्या आयुष्याची दोरी

पेण/क्राईम रिपोर्टर

**रागाच्या भरात माणूस काय करील याचा नेम नाही. पती-पत्नी मधील वाद हि एक सामान्य बाब झालीय. कारण पती पत्नी मधील शुल्लक कारणावरून झालेली हि तेवढ्यापुरती असतात. कारण शेवटी दोघांनाही आयुष्यभर एकत्र राहायचं असते. पण कधी कधी मात्र अशा भांडणात पतीचा इगो दुखावतो आणि अत्यातून तो टोकाचा निर्णय घेतो. त्यासाठी शुल्लक कारण सुद्धा पुरेसे असते. रायगड जिल्ह्यातील डोळ्नी गावात अशाच एका घटनेत मुलाला थंड पाण्याने आंघोळ घातल्याच्या शुल्लक कारणावरून एका इसमाने पत्नीची हत्या केली आणि मृतदेह फासावर लटकवून आत्महत्येचा बनाव केला. पण पोस्टमार्टेम अहवालात पतीचे पितळ उघडे पडले आणि पोलिसांनी पतीला अटक केली.**

वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या डोळ्नी गावात सतीश गणेश म्हात्रे ३६ हा इसम त्याची पत्नी कृणाली आणि ३ वर्षाच्या मुलासह राहत असे. दरम्यान कृनालीने तिच्या ३ वर्षाच्या मुलाला थंड पाण्याने आंघोळ घातली याचा सतीश म्हत्रला भयंकर राग आला आणि त्याने पत्नीच्या डोक्यात जड वस्तूचा प्रहार करून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह फासावर लटकावून तिने आत्महत्या केल्याचा बनाव केला. मात्र शवविच्छेदन अहवालात कृनालीनीच्या डोक्याचे हाड मोडल्याचे आढळले. ...पान २ वर

## पैशांसाठी दिराला ब्लॅकमेल करायला गेली संतापाच्या भरात त्याने वहिनीची हत्या केली

वैजापूर (शिऊर)/क्राईम रिपोर्टर



**शरीर सुखाला चटावलेली बाई एकाच वेळी पुरुषाकडून दोन्ही गोष्टीचा फायदा करून घेत असते. एकीकडे त्याच्याकडून आपली शरीरसुखाची गरज भागवून घेत असते, तर दुसरीकडे त्याच्याकडून पैसेही उकळत असते आणि त्या सुखासाठी आसुसलेला पुरुषही तिला लागेल तेंव्हा पैसा देत असतो. पण किती पैसे मिळाले तरी बाईची हाव थांबत नाही. शिरूरमध्ये माया आणि तिचा चुलत दीर ज्ञानेश्वर यांच्या अनैतिक संबंधात असेच सुरु होते. माया त्याला शरीर देऊन त्याच्याकडून पैसे उकळत होती. पण तिला पैसे देऊन तोही कंटाळला आणि तिला टाळू लागला. तसे त्याला आपल्या मायाजालात अडकवण्यासाठी एकदा तिने त्याला बोलावले आणि सुख देऊन २० हजाराची मागणी केली. पण त्याने नकार देताच तिने त्याला बलात्काराचे केसमध्ये अडकवण्याची धमकी दिली. त्यामुळे ज्ञानेश्वर चिडला आणि तिथेच त्याने तिची गळा दाबून हत्या केली.**

शिऊर येथील दादासाहेब आगलावे याचा विवाह गेल्या सात आठ वर्षापूर्वी मायासोबत झाला. तो वैजापूर येथे मापाडीचे काम करीत होता. त्यांना सात वर्षाची मुलगी आणि पाच वर्षाचा मुलगा असा त्यांचा सुखी संसार होता. आई पत्नी मुलासह तो एकत्रच राहयला होता. घर तेथे किरकोळ कारणातून भांडणेही ठरलेली असतात. त्यातच मायाचे आणि तिच्या सासुची सारखी भांडणे होत होती. त्या दोघीचे कधीच एकमेकांशी पटत नव्हते. सासु सूनेची भांडणे म्हणून सुरूवातीला दादासाहेब ही त्या भांडणाकडे दुर्लक्ष करीत होता. घरी असला की तो पर्यायाने आपल्या आईची बाजु घेऊन मायाला बोलत होता.त्यामुळे माया त्याचेवर चिडत होती, त्याच्याबरोबर उलट भांडत होती. याचा परिणाम उलटाच झाला होता. नवऱ्याचे आपल्यावरील प्रेम कमी झाले आहे असा तिचा समज झाला होता. त्यातच रात्रीच्या बेडवरच्या खेळात ही तो तिला कमी पडत होता. घरात कौटुबिक कलह निर्माण झाला की या गोष्टी घडतच असतात तसेच त्याच्या बाबत ही झाले होते. माया ही ३०शीतील असल्याने तिची कमसीन ...पान २ वर

## एकतर्फी प्रेमातून खून करुन फसला फाशीचा दोर त्याच्या मानेभोवती बसला

गोंदिया/क्राईम रिपोर्टर

**एकतर्फी प्रेम माणसाला मनोविकृत बनवते आणि त्यातून अक्षरशः पशु बनतो, जी तरुणी आपली होऊ शकत नाही ती इतर कोणाचीही होता नये या भावनेतून तिच्याविषयी त्याच्या मनात असलेली प्रेमाची भावना नष्ट होऊन सुडाची भवन निर्माण होते आणि याच सुडाच्या भावनेतून तो तिच्या बाबत टोकाचा निर्णय घेतो. अशाच एका घटनेत एकतर्फी प्रेम करणाऱ्या एका माथेफिरूने एका तरुणीची निर्घुण हत्या केली होती. मात्र या प्रकरणात अवघ्या १0 महिन्यात न्यायालयाने त्याला फाशीची शिक्षा ठोठावली.**

गोंदिया येथील रावणवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत झिलमिली गावाजवळ खाजगी क्लासला जाणाऱ्या १७ वर्षीय मुलीची भर दिवसा खून करण्यात आला होता. दरम्यान हा खून एकतर्फी प्रेमातून हातोडयाने डोक्यावर वार करत तसेच ब्लेडने गळ्यावर हल्ला करत हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी आरोपी २१ वर्षीय आरोपीला न्यायालयाने आजीवन (मरेपर्यंत) सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. अशी गोंदिया जिल्ह्यातील पहिली घटना असून न्यायालयाने १० महिन्यातच निकाल लावत शिक्षा सुनावली आहे. २३ फेब्रुवारी २०२२ ला सायंकाळी ४ च्या दरम्यान पिडीता ही झिलमिली मार्गाने ग्राम कामठा येथील खासगी क्लासला जात होती. ...पान ६ वर

## पत्नीवर वाईट नजर ठेवताच त्याचा संताप वाढला घर मालकाच्या मुलाचा भाडेकरूनेच काटा काढला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत प्रमोद

**अनैतिक संबंध धोकादायक असतात. कारण अशा संबंधामुळे एकीकडे समाजात बदनामी होते, तर ज्याच्या कुटुंबातील महिलेचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध असतात तो सुडाने पेटलेला असतो. अशावेळी तो एखाद्याचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. जळगावमधील अशाच एक घटनेत भाडेकरूच्या पत्नीवर घरमालकाच्या मुलाची वाईट नजर होती. त्यातून दोघांमध्ये वाद सुद्धा झाला आणि एके दिवशी भाडेकरूने आपल्या मित्राच्या मदतीने घरमालकाच्या मुलाचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



सुरेश हरी शेट्टी हे पेंशनर गृहस्थ असून समाजकल्याण विभागाची सेवा बजावल्यानंतर ते सेवानिवृत्त झाले आहेत. एकुलता मुलगा प्रमोद आणि तिन मुली अशा चौघांची लग्नकार्य त्यांनी पार पाडली. जळगावच्या मेहरुण शिवारातील जय भवानी नगर परिसरात राहणाऱ्या सुरेश शेट्टी यांचा मुलगा प्रमोद हा उत्तर महाराष्ट्र विद्यापिठात कंत्राटी स्वरुपावर सफाई कामगार म्हणून कामाला होता. सकाळी आठ ते चार अशी प्रमोदच्या कामकाजाची वेळ होती. सुमारे २ वर्षापुर्वी सुरेश शेट्टी यांनी त्यांच्या स्वमालकीच्या घराचा वरचा मजला सुनिल उर्फ साबीर ...पान २ वर

## बारबालेचं स्वप्नमहाल अखेर रक्ताने माखला लग्नाचा तगादा लावताच तिचा गेम करून टाकला

पनवेल/एस. कुमार



मयत उर्वशी

**बारबालांचे प्रेम हे अळवावरच्या पाण्याच्या थेंबासारखे असते. जोवर तिच्यावर पैशाची बरसात होते तोवरच ती प्रेमाचे रंग उधळत असते. पैसा संपला कि तिच्या प्रेमाचा रंग फिका पडतो. त्यामुळे बारबालांच्या लव्ह स्टोरीला सहसा भवितव्य नसते. देवनारमध्ये राहणारा जीम ट्रेनर कोपर खैरणे येथील बारबालेच्या प्रेमात पडला. सुरवातीचे काही दिवस दोघांनी मौजमजा केली, पण तिने लग्नाचा तगडा लावताच तो वैतागला आणि एके दिवशी मित्राच्या मदतीने त्याने तिची हत्या केली.**



रायगड जिल्ह्यातील पनवेल, माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या धामनी गाव.या गावाच्या जवळ गाढी नदी आहे. या नदीच्या पुलाखालील पात्रात दिनांक १४ डिसेंबर २०२२ रोजी २५ ते ३० वर्षे वयाच्या एका अनोळखी महिलेचे प्रेत पडलेले होते. सुजाण नागरिकांनी या घटनेची खबर पनवेल पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन खात्री केली असता, कोणी तरी अज्ञात महिलेचा गळा आवळुन तिचा खुन करून ते प्रेत नदीपात्रात फेकुन दिले असल्याने लक्षात आले. पोलिसांनी घटनास्थळ व मृतक ...पान ६ वर

CMYK

26 DECEMBER 2022 TO 01 JANUARY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/24/2022 10:16 PM Page 1



पान १ वरून....

## दगडावर आपटून मुलाची हत्या...

अद्याप कायम असल्याचे पाहायला मिळतोय. मुलगी नको म्हणून स्त्री भ्रूण हत्यासारखे प्रकार केले जात आहेत. मात्र नागपुरातून काही वेगळाच प्रकार समोर आलाय. वर्षभरापूर्वी मुलगा नको म्हणून बापानेच एका वर्षाच्या मुलाची हत्या केल्याचा प्रकार नागपूरमध्ये समोर आला होता. याप्रकरणी निर्दयी बापाला सत्र न्यायालयाने आजन्म कारावास आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. नागपूरमधील वाकोडी गावात एका ४० वर्षीय मजुराने पत्नीशी झालेल्या भांडणानंतर आपल्या एक वर्षाच्या मुलाची हत्या केली होती. भजन मेहताब कवरेती असे या आरोपीचं नाव आहे. २५ मे २०२१च्या रात्री वाकोडी गावातील रहिवासी आरोपी भजन मेताब कावरेती याने त्याच्या पत्नीकडे दारू विकत घेण्यासाठी पैसे मागितले आणि तिने त्याला नकार दिला होता. पैसे न दिल्याने त्याने पत्नीला मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी घरातील एका वर्षाच्या मुलावर त्याची नजर पडली. मला मुलगा नाहीतर मुलगी हवी होती असे म्हणत त्याला उचलले. त्यानंतर पायाला धरुन त्या मुलाला घरातील अंगणात असणाऱ्या दगडावर आपटले. यामध्ये त्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. मुलाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. आरोपीने मृत मुलाला घरात ठेवले होते आणि पोलीस येण्याआधी मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा विचार करत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली होती. यानंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ (हत्या) अंतर्गत गुन्हा दाखल करत तपास सुरु केला होता. पोलिसांनी न्यायालयात भजन कवरेती विरुद्ध आरोपपत्र दाखल केले. अतिरिक्त सरकारी वकील आसावरी परसोडकर यांनी सरकारची बाजू मांडली. न्यायाधिश एस.एम.एस.ए. अली यांनी दोन्ही पक्षांची बाजू ऐकून आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली.

## पिता-पुत्राचे नाते रक्ताच्या सड्यात...

ती काही भानगड नको म्हणून ती धाकटा मुलगा विठ्ठल याला गप्प बसवत होती. त्यामुळे तो आई वर ही चिडत होता. परशुराम हा दररोज दारू पिऊन आला की, घरात मारामारी भांडणे ही ठरलेली असायची. त्यामुळे त्यांच्या घरातील भांडणे ही शेजाऱ्यासाठी तमाशाच ठरलेली होती.त्याची भांडणे ही शेजाऱ्यासाठी डोके दुखीच होती. कारण दारूच्या नशेत परशुराम हा त्यांना ही शिव्या घालत होता.म्हणून ते त्यांची भांडणे सोडवायला ही येत नव्हते.त्यांच्या दारूच्या व्यसनामुळे अगोदरच त्याच्या घरचे लोक त्रासलेले होते. तर दुसरीकडे शेजारी ही त्रासलेले होते. रोजचे मडे त्या संगे कोण रडे अशी त्यांची स्थिीती झाली होती. परशुरामची दारू सोडविण्यासाठी त्यांच्या घरच्या लोकांनी बरेच प्रयत्न केला होता. पण त्यात त्यांना यश आले नव्हते. उलट दारू पिण्याचे त्याचे प्रमाण वाढले होते. दारू पिऊन घरात मुलांना बायकोला शिव्या घालणे त्यांना कामाचे हुकूम सोडणे आणि अरेरावी करणे एवढेच त्यांना माहित होते. घराच्या शेतीत त्यांना काम करणे तर सोडाच ते तिकडे कधी जास्त फिरकत ही नव्हते. सगळे मुले आणि त्यांची बायकोच बघत होते. तरी ही बायको मुलांना मारहाण करण्या पर्यत त्यांची मजल गेली होती. त्याची कटकट आता कुणालाच सहन होत नव्हती. तरी ही ते सारे काही त्याचे वागणे सहन करीत होते. मागील काही दिवसापासून त्यांचा त्रास वाढला होता. डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात परशुराम याने फुल्ल दारू प्यायलेली होती. दररोज तो दारू पिऊन येवून घरात कटकट लावत बायकोला आणि मुलगा विठ्ठलला मारायला जात होता. विठ्ठलचा रागीट स्वभाव त्याला माहित होता. तरी ही तो दारूच्या नशेत त्याच्याशी कुरापत काढत होता. हम करे सो कायदा असे त्याचे होते. रात्रीच्या वेळी शेतातील ऊसाला पाणी देण्यावरून बाप आणि मुलग्यात जोरदार भांडण झाले होते. तू ऊसाला पाणी दयायला का गेला नाहीस असे दारूच्या नशेत तर्र होऊन परशुराम विठ्ठलला विचारात होता. एक तर बाप दारूच्या नशेत शिव्या देत काम ही सांगत आहे आणि उलट मारायला ही अंगावर येत आहे म्हटल्यावर विठ्ठलचे डोके सनकले. त्याने बाजुलाच पडलेला रॉड उचलला आणि बापाच्या डोक्यात दोन तीन वेळा हाणला. त्यावेळी परशुराम हा ओरडत जागीच कोसळला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव चालू झाला होता.त्यावेळी घरात मोठा भाऊ आणि त्यांची आई सरस्वती हे देखील नव्हते. परशुराम हे ओरडत डोके धरून खाली पडल्यावर ते तडफडत होते. आजुबाजुला ही कुणी नव्हते.विठ्ठल वडिलाकडे बघून दात ओठ खात होता. मोठया प्रमाणात त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाल्याने परशुराम याचा जागीच मृत्यू झाला. आपल्या हातून वडिलांचा खून झाल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा त्याच्या डोक्यात विचार आला. रात्रीच्या अंधारात त्याने तसाच त्याचा मृतदेह एका गोणीत भरला. ती गोणी त्याने आपल्या दुचाकीला बांधली. तेथून तो निपाणी मुधोळ हायवेवर शेताकडे आला. मंटूर बायपास रस्त्याच्या बाजुलाच त्याचे शेत होते.ऊसात एका बाजुला कुपनलिका होता. त्याने मृतदेहाने भरलेली गोणी उचलून ऊसात आणला.त्याच्या डोक्यात वेगवेगळे विचार येत होते.शेवटी त्याने विचारपूर्वक कोयत्याने वडिलांच्या मृतदेहाच्या शरीराचे ३० तुकडे केले.ते तुकडे करीत असताना त्याचा हात जरा ही थरथराला नव्हता. त्यांनतर ते तुकडे त्याने एक एक करीत कुपनलिकेत टाकले. त्यानंतर तो शांत डोक्याने आपल्या घरी परतला. घरात कुणीच नसल्याने तो शांत झोपला. दुसऱ्या दिवशी परगावी गेलेले त्याची आई आणि भाऊ घराकडे परत आले. दिवसभर परशुराम घरात नसल्याने त्यांना काही वाटले नाही. रात्री मात्र सरस्वती यांना आपला नवरा कुठे गेला आहे आणि तो अजून कसा काय परत आला नाही याची शंका येवू लागली. त्यावेळी त्यांनी विठ्ठल याला याबाबत विचारले असता त्याने त्याना खोटेच सांगितले की वडिल काल बाहेर गेलेत ते अजून ही आले नाहीत. त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून रात्री तसेच काही विचार न करता झोपी गेले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळ पर्यत ही ते परत आले नाही म्हटल्यावर सरस्वती याना वेगळीच शंका आली त्यांनी खडसावून विठ्ठलला विचारल्यावर त्याने आपणच वडिलांच्या डोक्यात लोखंडी रॉडने वार करून त्याचा खून केला असून त्याच्या मृतदेहाचे तुकडे करून शेतातील कुपनलिकेत टाकल्याचे सांगितले. ऐकून सरस्वती आणि मोठा भाऊ आनंद याच्या पायाखालची जमीनच सरकली. सरस्वतीने मोठा अक्रोश करून आजुबाजूच्या लोकांना जमा केले. त्यावेळी त्यांना ही समजले की विठ्ठलने वडिलांचा खून केला आहे. या घटनेनंतर सरस्वती आणि आनंदने विठ्ठल याला घेऊन मुधोळ पोलीस स्टेशन गाठले. विठ्ठलने वडिल परशुराम याच्या मृतदेहाचे तुकडे केल्याचे ऐकून पोलीस ही चक्रवले होते.त्यांनी त्याला ताब्यात घेऊन घटनास्थळ गाठले. तेथे त्यांनी जेसीबी लावून कुपनलिकेतून परशुरामच्या मृतदेहाचे दहा ते बारा तुकडे बाहेर काढले.घटनास्थळी बघ्याची गर्दी झाली होती. पाहणारे प्रत्येक जण सुन्न होऊन पाहत होते. पोलीसांनी काढलेल्या मृतदेहाचे तुकडयाचे पंचनामा करून ते फॉरेनिस्क लॅबला पाठवून दिले. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत परशुरामची बायको सरस्वती आणि मोठा मुलगा आनंद यांच्या कडून घेतली असल्याने ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांना आला होता. शिवाय विठ्ठलने आपला गुन्हा कबुल केला असल्याने मयत परशुराम याची बायको सरस्वती याच्या कडून या घटनेची लेखी फिर्याद पोलीसांनी लिहून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी परशुराम कुळली (वय ५४) याची हत्या करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी त्याचा मुलगा विठ्ठल कुळली (वय २०) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून विठ्ठल याला मा.कोर्टासमोर हजर केले.मा.कोटीने त्याची रवानगी जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी विठ्ठलकडून गुन्हयात वापरलेला कोयता आणि दुचाकी जप्त केली.मानवेतला ही कलंक लावणारी घटना ऐकताना आणि बघताना लोकांच्या अंगावर शहारे येत होते. वडिल मुलांचे नाते खरे तर भावनिक असते.वडिलाच्या पायचे चप्पल मुलाच्या पायात आले की, त्याचे नाते खरे तर मैत्रीचे बनते. पण या घटनेत व्यसनाधीन परशुरामने हद्दच केली आणि त्याही पुढे जात मुलगा विठ्ठलने रागाच्या भरात कहर केला. रागाच्या भरात त्याने जन्मदात्या बापाला संपविले.नव्हे त्याच्या मृतदेहाचे तुकडे केले. माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना नक्कीच अंगावर शहारे आणणारी आहे हेच या घटनेवरून दिसून येते.

## विकृतीची त्याच्या परिसीमा...

लोकेश सुनिल सोनवणे हा इयत्ता चौथीच्या वर्गात शिकणारा नऊ वर्षाचा बालक आपल्या आईवडीलांसह रहात होता. याच परिसरात राहुल उत्तम पवार हा एकोनिस वर्षाचा तरुण देखील रहात होता. एकाच परिसरात दोघे रहात असल्यामुळे साहजीकच दोघे एकमेकांना चांगल्या प्रकारे परिचीत होते. बुधवार दि. ३० नोव्हेंबर २०२२ चा तो दिवस होता. या दिवशी सकाळी लोकेश खेळण्यासाठी घराबाहेर गेला. दुपार झाली, सायंकाळ झाली तरी देखील लोकेश घरी परत आला नाही त्यामुळे त्याचे पालक हवालदिल झाले. आपला मुलगा कुठे गेला असेल, काय करत असेल असे एक ना अनेक प्रश्न त्याच्या आईवडीलांना पडले. त्याचा सर्वत्र शोध घेण्यात आला. मात्र कुठेही त्याचा शोध लागला नाही. अखेर त्याच्या वडीलांनी मनमाड शहर पोलिस स्टेशन गाठले. आपल्या मुलाचे कुणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची त्यांनी फिर्याद दाखल केली. बेपत्ता लोकेशचा शोध पोलिस आणि त्याचे पालक आपआपल्या परिने घेत होते. १ डिसेंबरचा दुसरा दिवस उजाडला. या दिवशी देखील लोकेशचा शोध अविरत सुरुच होता. दरम्यान मनमाड रेल्वे स्टेशनपासून जवळच असलेल्या झाडाझुडूपात बेपत्ता लोकेशचा मृतदेह आढळून आला. या घटनेची वार्ता परिसरात पसरण्यास वेळ लागला नाही. मनमाड शहर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते, जीआरपी निरीक्षक जोगदंड आणि रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मयत लोकेशच्या डोक्यावर दगडाने घाव घातल्याचे दिसून येत होते. लोकेशचा एक हात आणि हाताची करंगळी करवतीने कापल्याचे देखील पोलिसांना दिसून आले. मन हेलावणारे ते दृश्य होते. मयत लोकेशच्या मृतदेहाजवळच एक करवत पडलेली होती. त्या करवतीनेच त्याचा एक हात आणि हाताची करंगळी कापल्याचे दिसत होते. घटनास्थळावर लोकेशच्या पालकांचा आक्रोश मन हेलावणारा होता. त्यांचा आक्रोश बघून खाकी वर्दीतील अधिकारी - कर्मचारी देखील काही क्षणासाठी अस्वस्थ झाले. मात्र त्यांना भावनाविवश होवून चालणारे नव्हते. त्यांनी आपले कर्तव्य पार पाडत लोकेशच्या मृतदेहासह घटनास्थळाचा पंचनामा पुर्ण केला. त्यानंतर तो मृतदेह उत्तरीय तपासणीकामी मनमाड उप जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आला. घटनास्थळावरील करवत तपासकामी हस्तगत करण्यात आली. मृतदेहाची ओळख पटली तरी त्याचा मारेकरी शोधण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे होते. एवढा निर्घृण खून कुणी व का केला असेल? या निष्पाप बालकाचा काय दोष होता? असा सहज प्रश्न परिसरात व्यक्त केला जात होता. ज्या परिसरात लोकेशची हत्या करण्यात आली त्या परिसरासह नेहरु भवन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी सुरु असतांना एक फुटेज पोलिसांच्या हाती लागले. ३० नोव्हेंबरच्या दिवशी घटनास्थळावर मिळालेली करवत हातात घेवून एक तरुण जात असतांना सीसीटीव्ही फुटेजमधे आढळून आले. त्या तरुणाचा शोध घेतला असता तो नेहरु भवन परिसरातील सोन्या उर्फ राहुल उत्तम पवार असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे चौकशीकामी त्याला ताब्यात घेण्यात आले. डीवायएसपी समीरसिंग साळवे, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गिते आदींनी त्याची सखोल चौकशी केली असता सत्य उघड झाले. मयत बालक लोकेश सोनवणे आणि राहुल पवार हे दोघे एकाच परिसरात राहणारे होते. दोघे एकमेकांना चांगल्या प्रकारे ओळखत होते. घटनेच्या दिवशी लोकेश खेळण्यासाठी घराबाहेर पडला. त्याला बघून राहुल पवारच्या मनात वासना निर्माण झाली. लोकेशचा पाठलाग करत राहुलने त्याला गाठले. राहुलने त्याला बळजबरीने रेल्वे स्टेशन परिसरातील झाडाझुडूपात नेले. हैवान झालेल्या राहुलने लोकेशसोबत त्याठिकाणी अनैसर्गीक कृत्य करण्यास सुरुवात केली. अनैसर्गीक कृत्य सुरु झाल्यामुळे अवघ्या नऊ वर्षाचा निष्पाप बालक रडू लागला. त्याला असह्य वेदना सुरु झाल्या. मनात हैवान संचारलेल्या राहुलने लोकेशसोबत अनैसर्गिक कृत्य करुन आपली कामेच्छा पुर्ण केली होती. मात्र त्या बालकाचे विव्हळणे आणि रडणे काही केल्या थांबत नव्हते. असह्य वेदना होत असल्यामुळे तो रडणे थांबवण्याचे नाव घेत नव्हता. एक तास झाला तरी देखील लोकेशचे रडणे थांबत नसल्याचे बघून राहुल मनातून घाबरला. आता काय करावे हे त्याला सुचत नव्हते. या बालकाने हा प्रकार घरी कथन केला तर आपले बिंग फुटेल आणि आपण अडचणीत येवू अशी भिती त्याला सतावू लागली. यातून सुटका करण्यासाठी त्याची हत्या करण्याचा कुविचार राहुलच्या मनात चमकून गेला. तो कुविचार अमलात आणण्यासाठी तो कामाला लागला. जवळच पडलेला मोठा दगड राहुलने उचलला. तो दगड त्याने लोकेशच्या डोक्यात घातला. निष्पाप लोकेश दगडाच्या फटक्याने एका क्षणात मरण पावला. आधीच अनैसर्गिक कृत्याने बेजार होवून विव्हळणारा लोकेश दगडाचा घाव डोक्यात बसल्यामुळे एका क्षणात मृत्यूच्या दारात गेला. एवढे झाले तरी देखील राहुलचे सैतानी मन थांबण्यास तयार नव्हते. काही वेळातच त्याने एक करवत आणली. त्या करवतीने त्याने निष्पाप लोकेशचा हात कापून काढला. त्यानंतर हाताची करंगळी देखील कापली. हा प्रकार झाल्यानंतर राहुलने घटनास्थळावरुन पलायन केले. मात्र सीसीटीव्ही फुटेजमुळे तो पोलिसांच्या हाती लागला. घटना उघडकीस आल्यानंतर काही तासातच गुन्हा देखील उघडकीस आला. या तपासाचे श्रेय मनमाड शहर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते आणि त्यांच्या सहका-यांना जाते. सारासार विचार केल्यास एक गुन्हा लपवण्यासाठी मनुष्याच्या मनात दुसरा गुन्हा करण्याचा कुविचार चमकून जातो हे या घटनेतून दिसून येते. पहिला गुन्हा करण्याच्या कुविचारापासून मनुष्याने परावृत्त होण्यातच शहाणपण असते. मात्र मोहात पडलेल्या मनुष्याला ती वेळ चुकीचे कृत्य करण्यास भाग पाडते. अनैसर्गिक कृत्य करण्याच्या मोहात पडलेल्या राहुलच्या हातून एक गुन्हा घडला. तो गुन्हा लपवण्यासाठी त्याने थेट खूनाचा दुसरा गुन्हा केला. आजूबाजूचे कुपोषीत वातावरण मनुष्याला गुन्हा करण्यास प्रवृत्त करत असते असे देखील म्हणता येईल. आपल्या सभोवतालचे वातावरण पोषक आणि चांगले असल्यास मनुष्याच्या हातून सकारात्मक कृत्य घडत असते. मनुष्याने आपली बुद्धी कायम शाबूत ठेवणे गरजेचे असते हे देखील या निमीत्ताने सांगावेसे वाटते.

## पत्नीवर वाईट नजर ठेवताच त्याचा...

नियामतखां तडवी यास भाड्याने राहण्यास दिला होता. सत्यराज नितीन गायकवाड हा सुनिलचा मित्र होता. तो सुनिल तडवी यास भेटण्यासाठी वरच्या मजल्यावर नेहमी येत असे. दरम्यान घरमालक सुरेश शेट्टी यांचा मुलगा प्रमोद याची सुनिलच्या पत्नीवर नजर पडत असे. त्यातून दोघे एकमेकांसोबत बोलत होते. आपल्या पत्नीसोबत घरमालकाचा मुलगा प्रमोदचे बोलणे सुनिल तडवी यास आवडत नव्हते. तु माझ्या पत्नीकडे का बघतो व तिच्यासोबत का बोलतो या कारणावरुन भाडेकरी सुनिल हा प्रमोदसोबत वाद घालत होता. हा वाद एके दिवशी एमआयडीसी पोलिस स्टेशनपर्यंत गेला. त्यामुळे घरमालक आणी भाडेकरी यांच्यातील संबंधात तणाव निर्माण झाला होता.

अखेर घरमालक सुरेश शेट्टी यांनी भाडेकरी सुनिल तडवी यास घर रिकामे करण्यास बजावले. बराच वाद झाल्यानंतर सुनिल तडवी याने ते घर रिकामे केले आणि पत्नीसह दुसरीकडे राहण्यास निघून गेला. तेव्हापासून सुनिल तडवी हा प्रमोद कडे खुनशी नजरेने बघत होता. भाडेकरी सुनिल तडवी यास त्याचा मित्र सत्यराज गायकवाड याची साथ होती. सुनिल आणि सत्यराज हे दोघे प्रमोद यास जीवे ठार मारण्याची धमकी देत असल्याचे म्हटले जात होते. ८ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी प्रमोद कामावरुन घरी परत आला. त्यावेळी सुनिल तडवी आणि सत्यराज गायकवाड या दोघांनी प्रमोदची वाट अडवली. साल्या तु माझ्या पत्नीचा पिच्छा सोडून दे नाहीतर तुला कायमचे संपवून टाकू अशी सुनिलने प्रमोदला धमकी दिल्याचे म्हटले जाते. आपल्याला सुनिल आणि सत्यराज या दोघांकडून झालेली शिवीगाळ आणि जीवे ठार करण्याची धमकी मिळाल्याचे प्रमोदने लागलीच घरी आल्यानंतर कथन केले. हा प्रकार बराच गंभीर झाल्याचे एकंदरीत दिसत होते. १० डिसेंबर २०२२ रोजी नेहमीप्रमाणे प्रमोद सकाळी सात वाजता उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कामावर गेला. दुपारी नेहमीप्रमाणे त्याचे पत्नीसोबत फोनवर बोलणे झाले. त्यानंतर सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास तो घरी परत येणे अपेक्षीत होते. मात्र तसे झाले नाही. तो घरी आला नाही म्हणून घरातील सर्व सदस्य काळजीत पडले. त्याचा मोबाईल देखील लागत नव्हता. रात्रीचे अकरा वाजले तरी देखील प्रमोद घरी परत आला नाही. त्यामुळे सर्व जण जास्तच चिंता करु लागले. रात्रभर त्याचा सर्वांनी शोध घेतला मात्र सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. अखेर ११ डिसेंबर रोजी सकाळीच सुरेश शेट्टी यांनी एमआयडीसी पोलिस स्टेशन गाठत प्रमोद बेपत्ता झाल्याची खबर नोंदवली. एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने त्याचा शोध सुरु केला. दरम्यान १२ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास जळगाव तालुका पोलिस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना प्रमोदचा मृतदेह निमखेडी शिवारात गिरणा नदी रेल्वे पुलाजवळ निर्जन जागी आढळून आला. प्रमोदचा मृतदेह रक्तबंबाळ आणि छिन्नविच्छिन अवस्थेत आढळून आल्याने हा खूनाचा प्रकार असल्याचे स्पष्ट झाले होते. त्याच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार केल्याचे दिसत होते. दोन्ही हातांवर जागोजागी आणी पाठीवर देखील शस्त्राचे वार दिसून आल्याने परिसरात खळबळ माजली. जवळच त्याची मोटार सायकल लावलेली होती. प्रमोदचा रक्तबंबाळ अवस्थेतील मृतदेह बघून त्याच्या वडीलांचा सुनिल आणी सत्यराज या दोघांवर संशय बळावला. दोघे बेपत्ता झाले होते. आपल्या पत्नीसोबत प्रमोदचे अनैतिक संबंध असल्याचा सुनिल यास संशय होता. त्या संशयातून सुनिलने त्याचा साथीदार सत्यराज याच्या मदतीने प्रमोदची हत्या केल्याची सुरेश शेट्टी यांची खात्री झाली. त्यामुळे सुरेश शेट्टी यांनी या घटनेप्रकरणी जळगाव तालुका पोलिस स्टेशनला दोघांविरुद्ध खूनाची फिर्याद दाखल केली. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. ३५७/२०२२ भा.द.वि.३०२, ३४ नुसार दाखल करण्यात आला. दरम्यान एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाला या गुन्ह्यातील संशयीत दोघे उमाळा जंगल शिवारात लपून बसल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्या माहितीच्या आधारे सत्यराज नितीन गायकवाड (रा. गणेश नगर, जळगाव) आणि सुनिल नियामतखाँ तडवी (रा. पंचशील नगर, फुकटपुरा, तांबापुरा, जळगाव) या दोघांना एमआयडीसी पोलिस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाने शिताफीने जंगलातून ताब्यात घेतले. या तपासकामी पो.नि. जयपाल हिरे यांचे तपास पथकाला योग्य ते मार्गदर्शन लाभले. पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्या पथकातील सहायक फौजदार अतुल वंजारी, पो.ना. सुधीर सावळे, किशोर पाटील, इम्रान सैय्यद, हेमंत कळकसर, छगन तायडे, सचिन पाटील, गणेश शिरसाळे, मुकेश पाटील, योगेश बारी, गोविंदा पाटील आदींनी दोघा संशयीतांना ताब्यात घेण्याकामी सहभाग घेतला. अटकेतील दोघांनी आपाला गुन्हा कबुल केला असून त्यांना पुढील तपासकामी जळगाव तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## पैशांसाठी दिराला ब्लॅकमेल ...

जवानी फडफडत होती. एकतर नवरा आपल्याकडे लक्ष देत नाही ही तिची भावना झाली होती. त्यातच सासुबरोबरच्या भांडणाने ती वैतागलेली होती. घरात आपल्याबरोबर प्रेमाने कुणीच वागत नाही अशी तिची समजुत झाली होती. त्यातच तिच्या घरात तिचा चुलत दीर ज्ञानेश्वर आगलावे हा येत होता. तो मायाच्या सौदर्याला भुलला होता. त्याला ती आवडत होती. तिची कमसीन जवानी पाहून तो आपली लाळ घोळीत होता. तो तिला वहिनी म्हणून बोलवित होता. तिला ही तो आपला चुलत दीर आहे हे माहित असल्याने ती त्याचेबरोबर कोणताही आडपडदा न ठेवता बोलत होती. याचाच त्याने फायदा घेत तो तिच्या मनावर फुंकर घालीत त्याने तिच्याशी जवळीक निर्माण केली. ती ही त्याच्याकडे या कारणातून आकर्षीत झाली. तिने ही त्याच्या मनातील ओळखले असल्याने ती ही त्याला भाऊजी म्हणून बोलवित त्याच्याशी लाडी गोडी लावीत होती.दोघे ही समवयस्क असल्याने त्या दोघांना जवळ यायला वेळ लागला नाही दोन मुलांची आई असलेल्या मायाची जवानी ओसांडून वाहत होती.ती त्या बाबत अतृप्त आहे हे त्याने ओळखले होते. म्हणूनच तो तिला काय पाहिजे आणि काय नको ते बघत होता.तिला ही त्याच्याकडून तेच पाहिजे असल्याने ती त्याला आपल्या नाजूक अदांनी खेळवू लागली होती. त्या दोघात आता शारीरिक आकर्षण निर्माण झाले. एकदा घरात कुणी नसताना ज्ञानेश्वर घरी आला होता. ती कपडे बदलत होती. तो आल्याची चाहूल लागताच मुद्दामच साडी नेसत असल्याचा बहाना केला.तिला परकर आणि ब्लाऊजवर बघून तो चेकाळलाच होता. सरळ जाऊन त्याने तिला मिठी मारली.ती त्याच्या घट्ट मिठीत आडकली होती.कुणी तरी पाहिल मला सोडा असा तिने उगीच बहाना केला. पण हाताला लागलेले पाखरू सोडण्या इतका तो मुर्ख नव्हता.तो तिच्याशी रोमान्स करीत त्याने तिला त्या कामासाठी तयार केले. बघता बघता ते दोघे निर्वस्त्र होत बेडवर आले. त्याच्या दणकट अंगाखाली ती कुस्करत होती. बेडवरच्या खेळात ती माहिर असल्याने ती त्याला खेळवत होती. तो ही त्या खेळात तसा हुशारच होता. मायाची टंच आणि भरगच्च जवानी बघून तो चेकाळला असल्याने तो ही तिच्यावर तुटून पडला. पहिल्याच खेळात त्याने तिला तृप्त केले. तशी ती त्यावेळेपासून त्याला भावोजी तुम्हीच पाहिजे म्हणून लागली. त्या दिवसापासून त्या दोघांता सारखे शरीर संबंध येऊ लागले होते. घरात कुणी नसताना तो घरी येऊन तिला तृप्त करीत होता. परंतु या गोष्टीची भणक तिचा नवरा दादासाहेब आणि तिची सासु यांना लागलेली नव्हती. गेल्या सहा सात महिन्यापासून त्या दोघांचे ते संबंध होते. मायाच्या मनात मात्र आता वेगळेच होते. ती त्याच्याकडून आता पैशाची मागणी करू लागली होती.एकदा दोनदा त्याने तिची गरज बघून तिला काही रक्कम ही दिली. परंतु अलिकडे मात्र ती त्याला सारखी पैसे मागत होती.काही तरी कारण सांगून ती त्याच्याकडून पैशाची मागणी करीत होती. तो तरी तिला किती वेळा पैसे देणार होता. अलिकडे तर तो तिला भेटायला ही येत नव्हता. तिने फोन केला तरी तो तिला फोन ही करीत नव्हता. म्हणून ती त्याचेवर चिडली होती. एकदा दोनदा तिने त्याला बाहेर भेटून तु मला का भेटत नाहीस मला पैसे का देत नाहीस तुला माझ्यात आता इंटरेस्ट राहिला नाही काय? असे विचारून त्याचेबरोबर ही तिने भांडण काढले.तो आता आपल्याला भेटायला ही येत नाही आपली पैशाची गरज आणि ती गरज ही पुर्ण करीत नाही म्हणून तिने आता वेगळीच चाल खेळली. तिने एकदा घरी कुणी नसताना त्याला त्या कामासाठी बोलाविले. काम झाल्यावर तिने त्याच्याकडे त्यावेळी २०हजार रूपये मागितले. त्यावेळी त्याने माझ्याकडे आता पैसे नाहीत असे सांगितले. त्याने पैसे नाहीत म्हटल्यावर तिला त्याचा राग आला.ती त्याच्याबरोबर भांडण काढीत त्याला म्हणाली, तु जर मला पैसे दिले नाहीस तर मी तुला बदनाम करेन तु माझ्यावर बलात्कार केला आहेस हे मी सर्वांना सांगेन. तुझ्या विरूध्द पोलीसात तक्रार करेन, बलात्काराची केस करेन अशी धमकीच तिने दिली.तिच्या या धमकीला ज्ञानेश्वर घाबरला होता. आता आपले काही खरे नाही ही बाई भलीतच चालू आहे ही आपल्याला सहजा सहजी अशी सोडणार नाही हे त्याने ओळखले.ती त्याला शिव्या देत त्याची अब्रु काढत होती. भांडणात ती त्याला धमकी देत होती. शेवटी काम तर झाले होतेच आता हिला कायमचे थंड केले तर ठिक नाही तर ही बया आपल्याला डोईजड होणार हे त्याने ओळखले. रागाच्या भरात त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याने तिचा गळा इतका जोरात आवळून धरला होता की तिला काहीच हालचाल करता येत नव्हती. त्याच्या ताकदीपुढे तिचे काहीच चालले नाही शेवटी तिने मान खाली टाकली. ती निपचिप खाली पडल्यावर त्याने तिला सोडले. तिचा जागीच मृत्यू झाला. आता हिचे काय करायचे हे बालंट आपल्या अंगावर येणार म्हणून त्याने तिचा मृतदेह घरातून ओढून घराच्या पाठीमागील बाजूस आणला.घराच्या पाठीमागे सेफ्टी टॅक होता. त्या टॅकमध्ये त्याने तिचा मृतदेह टाकला आणि तेथून पसार झाला.रात्री उशिरा दादासाहेब घरी आल्यावर त्याला माया दिसली नाही म्हणून त्याने आपल्या आईला माया विषयी विचारले. ती त्याला म्हणाली मी दिवसभर घरात नव्हते. त्यामुळे ती कुठे गेली मला काही माहित नाही. रात्री उशिरा व दुसऱ्या दिवशी ही माया दिसली नसल्याने दादासाहेब आणि त्याच्या नातेवाईकांनी तिचा शोध घ्यायला सुरूवात केली परंतु तिचा शोध कुठे लागला नसल्याने शेवठी दादासाहेब याने शिऊर पोलीस स्टेशन गाठून आपली पत्नी माया आगलावे ही बेपत्ता झाली असल्याची तक्रार दाखल केली. पोलीस ही तिचा आपल्यां परीने शोध घेत होते. घराच्या पाठीमागील बाजूस असाणाऱ्या सेफ्टी टॅकमधून दुर्गधी येऊ लागल्यावर दादासाहेबने तेथे जाऊन पाहिल्यावर मायाचा मृतदेह त्या टॅकमध्ये दिसला. त्याने या घटनेची माहिती शिऊर पोलीसांना दिली. पोलीसांनी घटनास्थळी येऊन घटनेची पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह त्या टॅकमधून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत मायाची आई विठाबाई कराळे यांना दिली. त्यांनी या घटनेबाबत दिलेल्या फिर्यादीत मयत माया हिचा पैशासाठी छळ तिचा नवरा दादासाहेब आणि त्याची आई करीत असल्याचे म्हटले. यावरून पोलीसांना मायाचा खून तिचा नवरा दादासाहेब याने केला असल्याचा संशय येऊ लागला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना तो पोलीसांना फक्त एकच सांगत होता मी खून केला नाही.मला यातील काही माहित नाही. शेवटी पोलीसांनी मयत मायाचे मोबाईल कॉल तपासले असता घटनेच्या दिवशी तिने आपल्या मोबाईलवरून ज्ञानेश्वर आगलावे याला फोन केल्याचे दिसून आले. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन मायाच्या खूनाची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून मयत माया व आपले विवाह बाहय संबंध असल्याची माहिती दिली.मयत माया ही या कारणातून त्याचेकडे पैशाची मागणी करीत होती. घटनेच्या वेळी काम झाल्यावर मायाने त्याच्याकडे २० हजार रूपयाची मागणी केली होती. त्याने पैसे नाहीत असे म्हटल्यावर तिने आपल्याला बदनामीच्या केसमध्ये अडकविण्याची धमकी दिल्याने आपण तिचा खून करून मृतदेह सेफ्टी टॅकमध्ये टाकल्याची कबुली दिली. मयत मायाची आई विठाबाई कराळे हिने दिलेल्या फिर्यादीवरून माया दादासाहेब आगलावे (वय ३२) हिचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी तिचा प्रियकर ज्ञानेश्वर आगलावे (वय ३४) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करून पोलीसांनी त्याला मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक मनिष कलवानिया,अप्पर पोलीस अधिक्षक सुनिल लांजेवार,उपधिक्षक महक स्वामी याच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पो.उप. निरी. अंकुश नागटिळक योगेश पवार, आर.आर. जाधव, अविनाश भास्कर यांनी केला. विवाहबाहय संबंधात ती जर अडकली तर ती त्या पुरूषाला पध्दतशीर खेळवत असते. त्याच्याकडून पैसे कसे आणि किती उकळायचे हे तिला चांगले माहित असते त्याने जर नाही म्हटले तर त्याला कसे अडकवायचे हे ही तिला माहित असल्याने ती आपला डाव खेळते आणि येथेच तिची फसगत होते हेच या घटनेवरून दिसून येते.

## रक्तात रंगली त्यांच्या संसाराची ...

त्यामुळे पोलिसांना संशय आला, त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी केली असता सातीश्नेच पत्नीची हत्या केल्याचे उघड झाले त्यानंतर २२ डिसेंबरला पोलिसांनी गुन्हा दाखल करून सतीशला ताब्यात घेतले या प्रकरणी वडखळ पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# लातूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहतुकीत बदल करणार; जिल्हा रस्ता सुरक्षा समिती



**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी १ जानेवारी पासून प्रायोगिक तत्वावर बसस्थानक ते शाहू कॉलेज रस्ता चार चाकीसाठी त्या बाजूने बंद करण्यात येईल. शहरातील प्रत्येक चौकातील अतिक्रमण काढण्यात येणार असून रिक्षा थांबे, बाहेर गावी जाणाऱ्या खासगी जीप्स, बस वाहतूक यांच्यासाठी जागा निश्चित करून देण्याची कार्यवाही करण्याची सूचना जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ता सुरक्षा समितीची बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंडे, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

एस. टी. प्रशासनाने शहरातील बसस्थानकातील पार्सल कार्यालयाची जागा बदलता येईल का हे पहावे. दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून प्रायोगिक तत्वार राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर या रस्ता या मार्गे चारचाकी वाहनासाठी बंद असेल तिथे येणाऱ्यासाठी गुळ मार्केटकडून प्रवेश सुरु असेल. उद्यापासून म्हणजे दि. २२ डिसेंबर २०२२ पासून गंजगोलाईतील फेरीवाले, भाजी विकेत्यांनी रेलिंगच्या आतच बसण्याची कार्यवाही करण्यात येईल. गंजगोलाई येथील स्वच्छतागृहाच्या शेजारी टोरिक्षा थांबा करण्यात यावा. शहरातील प्रत्येक चौकात झालेले अतिक्रमण तात्काळ काढून टाकण्याची कारवाई प्रशासनाने करावी. साई नाका चौकातील पीव्हीआरकडे जाणाऱ्या रिंगरोडच्या सर्व्हिस रोडवरील डिव्हायडरमुळे अडथळा निर्माण होत आहे, तो १२ फुटापर्यंतचा काढण्याची सूचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली. बसवेश्वर चौकातून मार्केट यार्डला येणाऱ्या रस्त्यावर फक्त मार्केटला येणाऱ्या मालवाहतूकीला परवानगी देण्यात येईल. इतर वाहनांना बंदी घालण्यात यावी. शहरातील नादुरुस्त असलेले सीसीटीव्ही दुरुस्तीचे कामे तात्काळ पूर्ण करावेत. अहिल्याबाई होळकर चौक, पीव्हीआर चौक या दोन ठिकाणी नवीन सिग्नल बसविण्याचे नियोजन करण्याबाबतही जिल्हाधिकारी यांनी सूचित केले.दरम्यान रात्री ८-०० ते सकाळी ९-०० वाजेपर्यंतच ट्रॅव्हल्स बस शहरात येतील. रात्री ८ पूर्वी आणि सकाळी ९ नंतर शहरात प्रवेश बंद असेल, याबाबत ट्रॅव्हल्स चालकांनी व मालकांनी काळजी घ्यावी. तसेच एमआयडीसी येथे ट्रक टर्मिनलसाठी महानगरपालिकेची जागा राखीव आहे. त्या जागेची तात्काळ पाहणी करून ट्रक टर्मिनल करण्याबाबत महानगरपालिकेने नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी दिल्या.

# किल्लारी तालुका निर्मितीसाठी नागपुरात शिष्टमंडळाचे निवेदन



**औसा/प्रतिनिधी**

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात तीस वर्षापासूनची किल्लारी तालुका निर्मितीची मागणी पूर्ण करावी. यासाठी विधानपरिषद सभापती, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, विरोधीपक्ष नेते आमदार यांना किल्लारी येथील शिष्टमंडळाने निवेदन सादर करत तालुका जाहीर करावा अशी मागणी केली. किल्लारी हे ३० हजार लोकसंख्या असलेले गाव आहे परिसरातील पण ५२ गावचे व्यापारी केंद्र आहे. शासनास वेळोवेळी निवेदने देऊनही न्याय मिळाला नाही. येथे कृषी उत्पन्न उपबाजार समिती, शासकीय ग्रामीण होते. रुग्णालय पोलीस स्टेशन पशुवैद्यकीय श्रेणी एक दवाखाना कृषी कार्यालय साखर कारखाना राष्ट्रीयकृत बँका वाचनालय शाळा महाविद्यालय सहकारी बँका आयुष रुग्णालय अशा विविध सुविधा आहेत. यासाठीचा लाभ घेण्यासाठी परिसरातील ६७ गावातील नागरिक येतात. किल्लारी तालुका व्हावा आशी अनेक दिवसापासून या परीसरातील नागरीकांची मागणी आहे. तालुका मागणीचे निवेदन देताना प्रभारी सरपंच युवराज गायकवाड, औसा बाजार समितीचे उपसभापती किशोर जाधव, ग्रामपंचायत सदस्य विजय भोसले, गुंडाप्पा बालकुंदे, गोविंद भोसले, रोहिदास हजारे आदी उपस्थित होते. यावेळी विधानपरिषद उपसभापती निलमताई गोरे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीश महाजन, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते विधानसभा अजित पवार, आमदार अभिमन्यू पवार यांना शिष्टमंडळाने निवेदन देण्यात आले.

# आरोग्यदायी जीवनासाठी औसा तालुका योगमय करा-कलावती भातंब्रे

**औसा/प्रतिनिधी**



पतंजली योगपीठ हरिद्वारच्या माध्यमातून योगगुरु रामदेव बाबा यांनी प्राणायाम, योगासन व ध्यान धारणेच्या माध्यमातून तसेच आपल्या दैनंदिन सकस आहाराच्या माध्यमातून आपले आरोग्य रक्षण करण्यासाठी योगाची देणगी दिली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुद्धा योगाला अत्यंत महत्त्व दिले म्हणून आज भारत योगाच्या क्षेत्रामध्ये विश्वगुरू बनत असल्याने आता प्रत्येक कुटुंबाने आपल्या संपूर्ण कुटुंबाला आरोग्यदायी करण्यासाठी औसा तालुका योगमय करावा असे आवाहन सौ कलावती भातंब्रे यांनी केले. औसा येथील श्री मुक्तेश्वर विद्यालयामध्ये आयोजित पतंजली योग समितीच्या महिला कार्यकारणी निवड कार्यक्रम प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ मीनाताई स्वामी होत्या यावेळी तारामती पांडे यांची उपस्थिती होती. पतंजली महिला योग समितीच्या औसा तहसील प्रभारी पदी सौ छायाताई शेवाळे, संघटन मंत्री दीपमाला चव्हाण, युवती प्रभारी लक्ष्मी मोरे, महामंत्री कोमल सावळकर, शहराध्यक्ष वैशाली लोकरे, कोषाध्यक्ष शुभांगी महामुनी, सहभागी रेखा गवळी यांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मीनाताई स्वामी, तारामती पांडे, नेताजी सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. पतंजली महिला योग समितीच्या माध्यमातून आपणावर टाकलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पडण्याचा संकल्प पतंजली योग समितीच्या महिला पदाधिकाऱ्यांनी नियुक्तीपत्र स्वीकारल्यानंतर केला. कार्यक्रमासाठी औसा शहरातील असंख्य महिला उपस्थित होत्या.

# औसा येथे 'खरी कमाई'चा आनंद मेळा उपक्रम साजरा

**औसा/प्रतिनिधी**



शहरातील श्री.चक्रधर प्राथमिक व माध्यमिक शाळेत 'खरी कमाई' हा उपक्रम बुधवार (दि. २१) रोजी राबविण्यात आला असून विद्यार्थ्यांना कौशल्य विकास अभ्यासक्रमाची ओळख करून देण्याच्या दृष्टिकोनातून हा उपक्रम हाती घेण्यात आला आला. यावेळी या उपक्रमाचे उदघाटन संस्थेचे सचिव शब्बीर शेख यांच्या हस्ते करण्यात आले. १०वी १२वी उत्तीर्ण होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव मिळावा, शालेय स्तरापासूनच उद्योगाभिमुख करण्यात यावे, इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने शाळेमध्ये 'खरी कमाईचा' (आनंद मेळावा) उपक्रम केला. या उपक्रमाअंतर्गत विविध प्रकारच्या वस्तू तयार करून त्याची विक्री शाळा स्तरावर करण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच उद्योगधंदे, दैनंदिन व्यवहार, खरेदी - विक्रीचा अंदाज यासह अन्य माहिती, चलनी व्यवहार, व्यापारी व्यवसाय याचा ज्ञान अवगत करण्यात आले. या 'खरी कमाई' उपक्रमात २२५ स्टॉल उभे करण्यात आले होते, यामध्ये जवळपास ५० हजार रुपयांची उलाढाल झाली. या उपक्रमात चक्रधर प्राथमिक व माध्यमिक शाळेचे विध्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध प्रकारचे पदार्थ तयार करून त्याचे दर ठरवून स्टॉल मांडले. यात सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. विविध पदार्थांचा आस्वादही घेण्यात आला. चक्रधर प्राथमिक, माध्यमिक शाळा, हर्षवर्धन प्राथमिक शाळा, तसेच स्पर्श इंग्लिश स्कूलच्या शाळेतील सर्व विध्यार्थी, शिक्षक, शिक्षिका, ईतर कर्मचारी आणि या शाळांचे पालक यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती, हा मेळावा प्रचंड उत्साहात साजरा करण्यात आला, व मेळाव्यास मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. या मेळाव्याच्या उपक्रमास यशस्वी करण्यासाठी दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक सुलतान शेख व मोईझ शेख यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, इतर कर्मचारी वर्गानी खूप परिश्रम घेत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

# भिवंडीत बाजारपेठेतच बनवले डम्पिंग ग्राउंड, स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात


**भिवंडी/अभिजित हिरे**



शहरातील निघणारा कचरा महापालिकेच्या वतीने ठेकेदार घंटा गाडीने उचलून शहरातील मुख्य बाजार पेठ आसलेल्या तीनबत्ती बाजार पेठेतील लोकवस्तीत असलेल्या महापालिकेच्या आरक्षण जागेत टाकला जात आहे. त्यामुळे या ठिकाणी कचऱ्याच्या टेकड्या बनल्या आहेत तसेच डम्पिंग ग्राउंडचे स्वरूप झाले आहे. मात्र यावर कोणत्याच प्रकारे पालिकेकडून औषधं फवारणी करण्यात येत नसलाचे स्थानिकाकडनं बोलण्यात येत आहे. त्यामुळे येथील परिसरात दुर्गंधी पसरली आहे. दुर्गंधीमुळे, डास, मच्छर मुळे येथील राहणाऱ्यसह नागरिकांना व्यापारी सहआरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

त्याच प्रमाणे येथील धान्यासह विविध प्रकारची दुकाने असून याचा नाहक त्रास व्यापाऱ्यांना स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे, तर येथील दुर्गंधीमुळे ग्राहक देखील येत नसल्याचा आरोप व्यापारी करीत आहे. तसेच महानगरपालिकेने हे डम्पिंग ग्राउंड बंद नाही केले तर व्यापारी नागरिकांकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# मंद्रूपचे रेणुकाचार्य शिवाचार्य महास्वामीजी लिंगैक्य!



सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप येथील मठाचे मठाधीश ष.ब्र.रेणुकाचार्य शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी (वय ६५) यांचे शुक्रवारी सकाळी अकरा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने उपचारादरम्यान अश्विनी रुग्णालयात निधन झाले आहे. रेणुकाचार्य शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी आज नेहमीप्रमाणे सकाळी दहा वाजून पाच मिनिटांनी पूजेसाठी बसत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि ते खाली कोसळले. यावेळी त्यांचे बंधू संगमनाथ हिरेमठ आणि इतरांनी त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या अश्विनी रुग्णालयात हलविले यावेळी उपचारादरम्यानच रेणुकाचार्य शिवाचार्य महास्वामीजी हे लिंगैक्य झाले. त्यांच्या लिंगैक्यामुळे वीरशैव लिंगायत समाजासह इतर समाजाचे मोठे नुकसान झाले आहे.

# वन्य प्राणी बाळगणाऱ्या व अनधिकृत बांधकामावर वनपरिक्षेत्र मांडवीची कारवाई



**वसई/प्रतिनिधी**

वनपरिक्षेत्र मांडवी अंतर्गत वन्यप्राण्यांची विक्री करणाऱ्या इसमास अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले तर दुसरीकडे अतिक्रमण निष्काशनाची कार्यवाही करुन वनजमीन मोकळी करण्यात आली. मिळालेल्या गुप्त बातमीवरुन वनकर्मचारी व WCCB तसेच NGO यांचेसह सापळा रचुन मांडवी वनक्षेत्रातील मौजे आचोळे येथे आरोपी अजित अफझल खान, वय २६ वर्षे, रा. रुम नं.१०२ पॅराडाईज अपार्ट, आचोळे, नालासोपारा (पु.) ता. वसई, यांच्या राहते घराची तपासणी केली असता तारा कासव-१ व अजगर-१ मिळुन आल्याने आरोपीविरुध्द वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये वनगुन्हा नोंद करणेत आला. तर दुसरीकडे मांडवी वनपरिक्षेत्रांतर्गत सातिवली परिमंडळामधील मौजे चंद्रपाडा संरक्षित वन सर्व्हे नं. २०६ मध्ये होत असलेल्या १० पायांचे अनधिकृत बांधकाम जेसेबीच्या मदतीने तोडून वनजमीन मोकळी करुन वन गुन्हा नोंदविण्यात आला. मागील एका महीन्यात अनधिकृत बांधकामां विरुध्द ७ वन गुन्हे नोंदविण्यात आले असुन १८ अतिक्रमणे निष्काशित करुन वन जमीन मोकळी केली आहे.

# बेपत्ता व्यक्तीचा अखेर मृतदेह सापडला

वाडा: वाडा नगरपंचायत हद्दीतील तळ्याचापाडा येथील बेपत्ता व्यक्तीचा तलावात बुडून मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याने त्यांना शोधण्यासाठी यंत्रणा आटोकाट प्रयत्न करीत होती. अखेर त्यांचा मृतदेह आढळून आला असून वसई - विरार अग्निशमन यंत्रणेच्या प्रयत्नांना यश आले आहे. गोविंद मोर ५६ असे या व्यक्तीचे नाव असून शहरातील परळीनाका भागात असलेल्या एका उत्सवातून ते रात्री १०च्या सुमारास आपल्या घराकडे तळ्याचापाडा येथे निघाले होते. घरी न पोहोचल्याने त्यांचा तातडीने शोध नातेवाईकानी सूरु केला मात्र कुठेही थांगपत्ता लागला नाही. तलावाच्या पाण्यात बुडण्याच्या आवाज आल्याचे काही रहिवाशांनी सांगितले असुन त्यानुसार वाडा नगरपंचायत व वसई-विरार अग्निशमन दलाने शोधकार्य सुरु केले होते.

**जिल्हा परिषद पालघर**

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

जा.क्र.:पाजिप/पापुवि/उपयां/३१०/२०२२ दिनांक : १६/१२/२०२२

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद पालघर यांचेमार्फत जिल्हा परिषद पालघर यांच्या विविध कार्यालयांमधील भंगार साहित्य, फर्निचर, संगणक व इतर निर्लेखन करावयाचे साहित्य करीता ई-लिलाव जाहीरात मागविण्यात येत आहे.

- विस्तृत माहिती व सविस्तर निविदा प्रपत्रे हे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- सदरची ई-लिलाव सूचना दिनांक २०/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक २७/१२/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत Download करता येतील.
- यापुढील सर्व शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरूनच प्रसिद्ध केली जाईल.

ई-लिलाव अटी शर्तीमध्ये बदल करणे. प्राप्त देकारांपैकी एक किंवा सर्व देकार कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पालघर यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
(जी.पी. निवडंगे)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, पालघर

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग, कार्यकारी अभियंता**

**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता.डहाणू, जि.पालघर यांचे कार्यालय**

ई मेल पत्ता : eepiped@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र. ०३/ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता. डहाणू, जि. पालघर (सुर्या प्रकल्प वसाहत मनोर ता.जि. पालघर), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे नोंदणीकृत पात्र मंजूर सहकारी संस्थांकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (Online) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर, ता. डहाणू, जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| १. | उपविभाग जव्हार कार्यालयाच्या आवाराच्या भोवती उर्वरित कंपाऊंड वॉल बांधण्याचे काम करणे. | पालघर | रु. २९,९९,६९२/- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधीः | दिनांक २३/१२/२०२२ सकाळी ११.३० वाजता ते दि. ०६/०१/२०२३ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत | | |
| ई-निविदा उघडणे : | दिनांक ०७/०१/२०२३ (दुपारी ०३.०० वा.) | | |

**खालील संकेत स्थळावर ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) http://wrd.maharshtra.gov.in

२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे प्रकल्प विभाग सुर्यानगर, ता. डहाणू, जि. पालघर कार्यालयातील सूचना फलक.

४) कंत्राटदाराने GeoTagging हे लिफाफा क्र.१ मधून सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा कंत्राटदाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येणार नाही. व सदर कंत्राटदारांची निविदा ग्राह्य राहणार नाही.
GeoTagging चा कालावधी दि. २७/१२/२०२२ ते ०५/०१/२०२३ पर्यंत आहे.

५) शासन, जनसंपदा विभागाच्या दि. ३०/११/२०१८च्या निर्णयानुसार व त्याअनुषंगाने आद्ययाबाबत शासन निर्णयाप्रमाणे या कामाच्या निविदा प्रक्रियेस कंत्राटदारांची निविदा भरण्याची सक्षमता तपासण्याची कार्यपद्धती लागू राहील.

**जा.क्र. पापाप्रबांवि/सुर्या/लेशा-२/२०४२/सन २०२२**
**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग, सुर्यानगर ता. डहाणू, जि.पालघर**
**दिनांक : १४/१२/२०२२**

सही/-
(दि.श्री.शेवाळे)
कार्यकारी अभियंता,
पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,
सुर्यानगर, ता. डहाणू, जि.पालघर

**जिमाका/पालघर/जाहि ७४/४९३/२०२२ दिनांक : १९/१२/२०२२**

26 DECEMBER 2022 TO 01 JANUARY 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 12/24/2022 10:17 PM Page 1



# महाराष्ट्राचे नशीबच फुटले सत्तेतले दलाल मुळावर उठले!

शाहू-फुले-आंबेडकर यांचा पुरोगामी महाराष्ट्र आज फुटीच्या मुळावर उभा आहे. कारण ज्यांनी महाराष्ट्र तोडण्याची स्वप्न पहिली होती त्यांच्या हाती आज महाराष्ट्र आहे. त्यामुळेच आज शेजाऱ्या पाजाऱ्यांची महाराष्ट्र विरुद्ध गरळ ओकण्याची हिंमत होत आहे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा हा लढवय्या महाराष्ट्र हताशपणे हे सर्व सहन करीत आहे. जणू काही महाराष्ट्र मेलेल्या आईचे दूध प्यायला आहे अशी अवस्था महाराष्ट्राची झालेली आहे आणि हे जर नजीकच्या काळात बदलण्याचा प्रयत्न झाला नाही तर महाराष्ट्राचे तुकडे पडतील. महाराष्ट्रात कुठल्याही पक्षाचे सरकारने असो ते महाराष्ट्राशी प्रमाणिक असायला हवे. त्यांनी फक्त आणि फक्त महाराष्ट्राच्या हिताचा, महाराष्ट्राच्या विकासाचा आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करायला हवा. पण दुर्दैवाने या बाबतीत महाराष्ट्र कमनशिबी ठरला आहे. आज जे कुणी सरकारमध्ये आहेत. त्यांना महाराष्ट्राच्या हितापेक्षा पक्षाची आणि आपल्या पक्षाची सरकारे असलेल्या गुजरात, कर्नाटक सारख्या शेजारी राज्यांच्या हिताची अधिक चिंता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातले उद्योगधंदे गुजरातला जात आहेत. विदर्भ मराठवाडा यांना महाराष्ट्र पासून वेगळा करायचा आणि महाराष्ट्राची ताकत कमजोर झाली की मुंबईवर घाव घालायचा अशी महाराष्ट्र विरोधी राजनीती आखली जात आहे. त्यासाठी हिंदुत्वाचा ढालीसारखा वापर करून घेतला जात आहे. आपला इस्लाम खत्रे में है अशी आवई उठवून ज्याप्रमाणे तरुण जिहादी तय्यार करण्यात आले. त्याच प्रमाणे हिंदू धर्म संकटात आहे असा खोटा प्रचार करून इथल्या तरुणांना दलीत अल्पसंख्यांक समाजाच्या विरुद्ध चिथावणी दिली जात आहे. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रात एक प्रतिगामी ताकत आणि दलीत मुस्लिम समाजाच्या विरुद्ध एक वातावरण तयार होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र ज्वालामुखीच्या उंबरठ्यावर आहे आणि या ज्वालामुखीचा कधीही स्फोट होऊ शकतो. महाराष्ट्रात इतके भयानक वातावरण कधीच नव्हते, पण २०१४ मध्ये हिंदुत्वाच्या नावाखाली लोकांची दिशाभूल करून बाळासाहेब ठाकरे यांच्या सारख्या लोक नेत्याच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन ज्यांनी महाराष्ट्रात आपली पाळेमुळे घट्ट रोवली तेच आज महाराष्ट्राच्या मुळावर उटले आहेत अशा वेळी महाराष्ट्रातील संविधानाला मानणारी आणि शाहू-फुले-आंबेडर यांच्या विचारांनी चालणारी जनता निमूटपणे हे सर्व सहन करणार की या लोकांच्या विरोधात उभे राहून महाराष्ट्राचे अस्तित्व, महाराष्ट्राचा स्वाभिमान टिकवणार हेच बघायचे आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद खूप जुना आहे. भाषावार प्रांत रचनेनंतर कर्नाटकने जवळपास ८५० मराठी भाषिक गावांना कर्नाटकात जबरदस्तीने डांबून ठेवले आहे. आणि कर्नाटकच्या जोखडातून बाहेर पाडण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सीमा भागातील जनतेचा लढा सुरु आहे. आणि या लढ्याला संपूर्ण महाराष्ट्राचा पाठींबा आहे. त्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समिती आणि महाराष्ट्र एकीकरण समितीने आंदोलने केली, पण कर्नाटक सरकार मात्र महाजन आयोगाचं तुणतुणे वाजवीत आहे. सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. अशावेळी संयम राखणे ऐवजी कर्नाटकाकडून सतत तिथल्या मराठी भाषिक जनतेला त्रास दिला जात आहे. राज्यात पूर्वी कॉंग्रेस, पुलोद आणि महा विकास आघाडीची सरकारे असताना कर्नाटक सरकार कडून कधीही महाराष्ट्राच्या विरोधात ताठर भूमिका घेण्यात आली नव्हती, पण सत्तांतर होताच गेल्या चार महिन्यांपासून कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून महाराष्ट्र विरोधी भूमिका घेतली जात आहे. प्रथम पाण्याचा प्रश्न उपस्थित करून सांगली जिल्ह्यातील ४० गावे कर्नाटकात येणार असल्याचे बोम्बाई यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील कन्नड भाषिक भागांवर दावा केला. सोलापुरात कर्नाटक भवन बांधण्याची घोषणा केली तसेच कन्नड वेदिके सारख्या प्रांतवाद जोपासणाऱ्या आणि सीमा भागातील मराठी बांधवांना त्रास देणाऱ्या संघटनांना हाताशी धरून सतत महाराष्ट्र विरोधी धोरण जिवंत ठेवले. सरकारच्या पाठिंब्यामुळेच कन्नड वेदिकेच्या गुंडांची महाराष्ट्रातील वाहनांवर पोलिसांच्या समोर दगडफेक करण्याची हिंम्मत झाली. महाराष्ट्राच्या दोन मंत्र्यांना कर्नाटकात प्रवेश नाकारण्यात आला. आणि हे सर्व घडत असताना महाराष्ट्र सरकार गप्प होते. महाराष्ट्र व कर्नाटकातील तणाव निवळवा म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन्ही राज्यातील मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. त्यात सर्वोच्च न्यायालयाचा सीमावादावर निकाल येईपर्यंत कुणीही एकमेकांच्या विरुद्ध दावे प्रतिदावे करू नये असे ठरलेले असताना कर्नाटक सरकारने महाराष्ट्राला एक इंचही जमीन देणार नाही असा कर्नाटक विधानसभेत ठराव केला. पण आमच्या विधानसभेत कर्नाटक विरुद्ध भूमिका घेण्याची आवश्यकता सरकारला वाटली नाही. आणि हाच हे सरकार महाराष्ट्र द्वेष्टे असल्याचा मोठा पुरावा आहे. कर्नाटकने महाराष्ट्राच्या अब्रूचे अशा तऱ्हेने धिंडवडे काढलेले असताना महाराष्ट्राच्या विधानसभेत त्यावर सत्ताधारी काहीच बोलायला तयार नाहीत. याचा अर्थ महाराष्ट्र सरकारला सीमा भागातील जनतेची काहीच पडलेली नाही किंवा कर्नाटकातील भाजप सरकारला कोणतीही अडचण येऊ नये यासाठी महाराष्ट्रातील सत्ताधारी गप्प आहेत. महाराष्ट्राच्या अस्मिते पेक्षा ज्या लोकांना भाजपच हीत अधिक महत्त्वाचं वाटतयं अशा लोकांना महाराष्ट्राच्या सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. पण महाराष्ट्रातील जनतेला हे कधी कळणार? लोक अजूनही महाराष्ट्र द्रोह्यांच्या मागे फरफटत जात आहेत. काय तर म्हणे हिंदू धर्म विरोधी लोकांपासून आमचे देव आणि धर्म संकटात आहे. शिकल्या सावरलेल्या लोकांना हे कसे काय पटते तेच कळत नाही? आमचा हिंदू धर्म इतका कमजोर आहे का की कोणीतरी धर्मातील काही कालबाह्य गोष्टींच्या विरोधात बोलल्यावर आपला धर्म संकटात येणार आहे? लोकांना धर्माच्या नावाने फसवून त्यांना आपल्या जाळ्यात ओढायचे आणि पाठी राख्यांची संख्या वाढवायची हे सध्या सुरू आहे. अर्थात याला खेड्या पाड्यातील अल्पशिक्षित लोक जरी फसले तरी शहरातील लोकांनी फसू नये अन्यथा या देशात दलीत मुस्लिमांना जगणे कठीण होईल!

# दोन अभिनेत्री; २०० कोटींचा वाद







अभिनेत्री-डान्सर नोरा फतेही हिने अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसविरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा केला आहे. सुकेश चंद्रशेखरच्या प्रकरणात तपास संस्थांकडून नोरा फतेही आणि जॅकलीन फर्नांडिस या दोघांचीही चौकशी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर नोरा फतेहीने आरोपांवर आक्षेप घेत जॅकलीन फर्नडीसविरुद्ध कोर्टात धाव घेतली, जॅकलीन फर्नांडिस ही कुहेतूने खोटा जबाब देत आहे, असा आरोप नोरा फतेहीने केला. यामुळे चित्रपट क्षेत्रात खळबळ माजली आहे.

**जॅकलिन मिळाला अंतरिम जामीन**

अभिनेत्री जॅकलीन फर्नांडिसला दिल्लीतल्या पटियाला हाऊस कोर्टानं ५० हजारांच्या जात मुचलक्यावर सप्टेंबर महिन्यात अंतरिम जामीन मंजूर केला होता. २०० कोटी रुपयांच्या मनी लाँडरिंग प्रकरणात ईडीने सुकेश चंद्रशेखरविरोधात पुरवणी आरोपपत्र दाखल केलं होतं. या आरोपपत्रामध्ये अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसचंही नाव होतं.

सुकेशने आजवर अनेकांना गंडा घातल्याचं समोर आलं होतं. ईडीनं काही महिन्यांपूर्वी कारवाई केल्यानंतर सुकेश चंद्रशेखरचे अनेक बॉलिवूड सेलिब्रिटीजबरोबर संबंध असल्याचं समोर आलं होतं. प्रामुख्यानं जॅकलिन फर्नांडिसचं नाव यात समोर आलं. या प्रकरणी ईडीने जॅकलिनची अनेक तास चौकशीही केली होती. २६ सप्टेंबर २०२२ रोजी पुन्हा जॅकलिन दिल्लीतल्या पटियाला हाऊस न्यायालयात हजर झाली. जॅकलिन एनआयए न्यायाधीश शैलेंद्र मलिक यांच्या न्यायालयासमोरही हजर होईल. कारण सुकेश चंद्रशेखर मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात पूरक चार्जशीटही दाखल करण्यात आली आहे.

अतिरिक्त सत्र न्यायालय शैलेंद्र मलिक यांनी जॅकलिनच्या जामीन याचिकेवर ईडीकडून उत्तर मागितलं आहे.व दरम्यान, या प्रकरणी जेव्हा जॅकलीनचं नाव पहिल्यांदा समोर आलं होतं, तेव्हा तिने एक निवेदन प्रसिद्ध करून माझ्या खाजगीपणाचा भंग होईल असे फोटो प्रसिद्ध करू नका असं आवाहन केलं होतं.

**२०० कोटींचं प्रकरण काय?**

सुकेश चंद्रशेखर यांच्यावर सध्या सुरू असलेली कारवाई ही २०० कोटींच्या मनी लाँडरिंग प्रकरणी होत आहे. उद्योगपती शिविंदर सिंग यांच्या पत्नी आदिती यांच्याकडून २०० कोटी उकळल्याचा आरोप सुकेश यांच्यावर आहे. आदिती सिंग यांनी दिलेल्या तक्रारीनंतर याप्रकरणी कारवाई करण्यात आली होती. रेनबॅक्सी उद्योग समूहाचे प्रमोटर शिविंदर सिंग हे एका प्रकरणात तुरुंगात कैद असल्यानं त्यांना सोडवण्यासाठी म्हणून सुकेश यांनी वसुली केल्याचं सांगण्यात आलं.

पीएमओ आणि गृहमंत्रालयातील अधिकारी असल्याचं सांगत फोनद्वारे फसवणूक करून सुकेश चंद्रशेखर यांनी आदिती यांना फसवलं होतं. विशेष म्हणजे तुरुंगातून तंत्रज्ञानाचा वापर करून सुकेश हा सर्व प्रकार करत असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. कारवाई करण्याची भीती दाखवत सुकेश यांनी वसुली केल्याचाही आरोप आहे. या संपूर्ण प्रकरणाचा तपास सध्या ईडी करत असून या तपासादरम्यान काही सेलिब्रिटींची नावं समोर आली आहेत.

जॅकलिन आणि सुकेश यांचे काही फोटोदेखील व्हायरल झाले होते. त्यानंतर ईडीनं जॅकलिन फर्नांडिसला चौकशीसाठीही बोलावलं होतं. त्यावेळी जॅकलिननं तिला सुकेशनं काही गिफ्ट दिल्याची माहिती ईडीला दिली होती.

एएनआयच्या वृत्तानुसार या गिफ्टमध्ये गुचीच्या तीन बॅग, जिमवेअर आऊटफिट, लुईस विटनचे लक्झरी शूज, दोन जोडी डायमंड रिंग्ज, ब्रेसलेट्स तसंच कारही दिली होती जी तिने परत केली यांचा समावेश असल्याचं ईडीनं चार्जशीटमध्ये नमूद केलं आहे. यासह ईडीच्या आरोपपत्रानुसार सुकेश चंद्रशेखरनं अभिनेत्री नोरा फतेही हिला एक बीएमडबल्यू कार गिफ्ट केल्याचं सांगण्यात आलं.

**कोण आहे सुकेश चंद्रशेखर?**

बेंगळुरुच्या भवानीनगरमध्ये राहणारा चंद्रशेखर हा एका मध्यमवर्गीय कुटुंबामध्ये जन्माला आला होता. बारावीनंतर तो ड्रॉपआऊट झाला. त्यानंतर त्याने रियल इस्टेटमध्ये काम करायला सुरुवात केली. दरम्यान, सुकेशच्यावतीनं जाहीर करण्यात आलेल्या निवेदनामध्ये त्याने आपण ठग नसल्याचा दावा केला होता. त्याच्यावर लावण्यात आलेले इतरही आरोप त्याने फेटाळले होते. अल्पवयीन असतानाच त्याने कार रेस आयोजित करायला सुरुवात केली होती. तेव्हापासूनच तो वरीष्ठ पोलीस अधिकारी असल्याचं सांगत अनेकांची फसवणूक करत होता, असा त्याच्यावर आरोप आहे.

**दिशायन**

२००७ मध्ये बेंगळुरूमध्ये जवळपास शंभर लोकांना बेंगळुरू विकास प्राधिकारणाचं काम करून देतो, असं सांगत फसवल्याप्रकरणी त्यांना सर्वप्रथम अटक झाली होती. २०१७ मध्ये एका गंभीर प्रकरणामध्ये सुकेश चंद्रशेखरला अटक करण्यात आली होती. त्यावेळी सुकेशनं निवडणूक आयोगामध्ये संपर्क असल्याचा दावा करत एका राजकीय पक्षाची फसवणूक केली होती. दक्षिणेतील अण्णा द्रमुक या पक्षाच्या शशिकला गटाला निवडणूक आयोगाकडून दोन पानं असलेलं निवडणूक चिन्हं मिळवून देण्याचा दावा सुकेश यांनी केला होता. एका हॉटेलमधून याबाबतची डील करत असल्याचा आरोप त्यावेळी करण्यात आला होता. तसंच एका हॉटेलमध्ये त्यांच्या खोलीतून एक कोटींपेक्षा अधिक रक्कमही जप्त करण्यात आली होती, असं काही माध्यमांनी जाहिर केलं होतं. एवढंच नव्हे तर सुकेश यांनी अनेक नेत्यांचे नातेवाईक असल्याचा बनाव करत अनेकांना गंडा घातल्याचेही आरोप त्यांच्यावर झाले आहेत. सुकेश हे लोकांना मोठ्या नेत्यांची नाव सांगून फसवायचे. काही जणांना त्यांनी एम. करुणानिधी यांचे आपण नातू असल्याचंही सांगितलं होतं, असंही आता समोर आलं आहे.सरकारी अधिकारी, अमित शहांच्या कार्यालयातील कर्मचारी आणि अगदी जयललितांच्या राजकीय कुटुंबातील असल्याचा दावा करताना त्याने खोटे फोन नंबर वापरून हे खरं असल्याचं दर्शवण्याचा प्रयत्न केला. स्पुफिंग ॲपच्या मदतीनं सुकेश यांनी हे केल्याचं सांगण्यात आलं आहे. जॅकलिनला त्यानं केलेल्या कॉलचा नंबर हा अमित शहांच्या ऑफिसचा दर्शवला होता. सुकेश हे सर्व या ॲपच्या माध्यमातून करत होते.

२०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात त्यांनी तुरुंगातूनच सर्वकाही केल्याचा आणि त्यासाठी तुरुंगातील कर्मचाऱ्यांना लाच दिल्याचाही आरोप आहे. मात्र यात अभिनेत्री जॅकलीन फर्नडीस आणि अभिनेत्री ़ डान्सर नोरा फतेही या गुंतल्या. ज्यामुळे आता या दोघींमध्ये वाद निर्माण झाला असून तो कोर्टापर्यंत गेला आहे. पुढे हे प्रकरण नेमकं काय वळण घेतं ते पाहुयात.

# शेतकरी विरोधी धोरणाने शेतकऱ्यांची इज्जत पणाला लागली!





शेतकऱ्यांच्या आत्महत्याचा कलंक मिटाविण्यासाठी दि. २३ डिसें.२०२२ ला दुपारी१२ वाजता शेतकरी संघटना, वारकरी संघटना व श्री गुरुदेव उपासक मंडळी, यांची संयुक्त बैठक विश्राम भवन, गडचिरोली येथे झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटना समन्वय समितीचे कार्याध्यक्ष श्री धनंजय पाटील काकडे हे होते. तसेच या बैठकीला प्रमुख पाहुणे डॉ.शिवनाथ कुंभारे, धन्वंतरी हॉस्पिटल गडचिरोली उपस्थित होते. या बैठकीला मार्गदर्शन करताना- धनंजय पाटील काकडे म्हणाले, चुकीच्या आर्थिक धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सतत वाढत आहेत, या देशात १८ जून १९५१ ला पहिली घटना दुरुस्ती करून बदल करण्यात आला, तेव्हा प. नेहरूजी हे हंगामी सभापती असताना शेतकरी विरोधी कायदे तयार केले. व शेड्युल ९ तयार करण्यात आले. त्यामध्ये जीवनावश्यक वस्तू कायदा व अनेक शेतकरी विरोधी कायदे करून शेतकरी व शेतमजुरांचे शोषण करण्यात आले. तेव्हापासून शेतकऱ्यांच्या परिस्थितीला आळा बसून शेतकरी आत्महत्या वाढणे सुरू झाले, त्यासाठी केंद्रातील शेतकरी विरोधी कायदे बदलून ते शेतकरी हिताचे करण्यात यावे, त्यासाठी आजी आमदार, खासदारांना विनंती करण्यात यावी अन्यथा हे पक्ष प्रतिनिधी जर कायदे दुरुस्ती करत नसेल त्यांनी आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नये. तो स्वतः पायउतार होण्यास सुरुवात करावी. ज्याप्रमाणे आमदार खासदारांचे मानधन व खासदारांना मिळणाऱ्या सुविधा मंजूर करण्यासाठी सर्व आमदार, व खासदार विधान भवन व संसद मध्ये एक मुखाने स्वतःच्या हितासाठी ठराव पारित करतात. राज्यकर्ते व पक्ष प्रतिनिधी हे जर समाजामध्ये शेतकऱ्यांचे फक्त आम्हीच हितचिंतक आहोत, असा जर कांगावा पेटवत असेल तर शेतकरी हिताचे कायदे करण्यासाठी सुद्धा त्यानी पुढे यावे. व सर्वच राजकीय पक्ष जर शेतकऱ्यांच्या बाजूचे आहेत, हे जर कोरड्या घोषणा देत असेल, तर त्यांनी शेतकरी विरोधी कायदे मोडण्यासाठी एकमुखी ठराव संसदेत का पास करू नये? आजपर्यंत प्रत्येक आमदार खासदारांनी स्टेजवर येऊन फक्त शेतकऱ्याचे दुःख मांडले, व शेतकऱ्यांच्या दुःखाचे भांडवल करून आमदार, खासदारक्या मिळविल्या? मंत्रिपदे मिळविलीत आणि शेतकरी मात्र ज्याच्या त्याच अवस्थेत ठेवला? स्वतंत्र काळात आत्महत्या होणे ही अतिशय गंभीर बाब आहे, व भारत देशाला ही कलंक लागणारी व्यवस्था आहे. त्यासाठी दि.१ फेब्रुवारी २०२३ ला शेतकरी- वारकरी, कष्टकरी, गुरुदेव सेवा करांची जनजागर दिंडी तीर्थक्षेत्र जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या आशीर्वादाने देहू येथून निघणार आहे, व पंढरपूर येथे चंद्रभागेच्या तिरी समारोप होणार आहे. जागर दिंडी राष्ट्रातून जात असताना गडचिरोली जिल्ह्यात १४ फेब्रुवारी २०२३ ला अड्याळ टेकडीवरून, किन्हाळा मार्गे गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. व रात्री मार्कंडा येथे मुक्कामी राहील. नंतर पुढे चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम, हिंगोली, अंबाजोगाई वरून पंढरपूरकडे जाणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात १८ जिल्ह्यातून ३ हजार किलोमीटर चा प्रवास पूर्ण करण्यात येईल . अशी माहिती शेतकरी संघटना समन्वय समितीचे कार्याध्यक्ष श्री धनंजय काकडे पाटील काकडे यांनी बैठकीत मार्गदर्शन करताना सांगितले. तसेच २३ तारखेला गडचिरोली तालुक्यात राजघाटा माल, झेपरा, दीपना या भागातील गावात वाघोबाचा हैदोस असून एका महिलेचा नरडीचा घोट वाघाने घेतला. राजघाटाची ही महिला आपल्या भाताच्या शेतात काम करत असताना वाघाने तिच्यावर झेप घेऊन तिला अर्धा किलोमीटर फरपटत नेले व पायाची तंगडी तोडून ताराबाई बाबुराव लोनबले या महिलेचे शव जागेवर पडून राहिले. महिलेचे शासकीय रुग्णालयात शव विच्छेदन करून करून शासनाने किरकोळ मदत जाहीर केली. या बाईला एक मुलगा राजेंद्र बाबुराव लोन, व मुलगी पत्राली असे दोन अपत्य असून , वाघाच्या नर बळीमुळे हे कुटुंब उघड्यावर पडले. या गावाला व कुटुंबाला शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे यांनी भेट दिली. गडचिरोली तालुक्यात किमान ४० जणांचे वाघाने नरबळी घेऊन कुटुंबे संपविली. मात्र वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहे, शासनाने या वन्य प्राण्यांचे संरक्षण करावे अशी मागणी शेतकरी संघटनेचा नेत्यांनी केली . तसेच या कार्यक्रमात सर्वश्री डॉ. शिवनाथ कुंभारे, यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच अरुण मुनघाटे, संजय ठाकरे, अरविंद पाटील वासेकर, रमेश भुरुसे, मनोहरजी चलाख, चाफले साहेब, रामचंद्र डोंगे, पंडितजी पुरके, केवलराम सालोडकर, डॉ.देवेंद्र मुनघाटे , राजू पाटील, देवाजी सोनटक्के , इत्यादी गडचिरोली जिल्ह्यातील प्रतिष्ठित शेतकरी व शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीला आलेल्या सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले. व शेतकरी- वारकरी, कष्टकरी व गुरुदेव सेवेकरी जनजागर दिंडीचे प्रत्येक गावातून मनोभावे स्वागत केल्या होईल. असे सर्वानुमते ठरले.

**- धनंजय पाटील काकडे; कार्याध्यक्ष**
**शेतकरी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र**

# वाढवण बंदराचा विकास करताना स्थानिकांचे सर्व प्रश्न चर्चेतून सोडविणार-उपमुख्यमंत्री

नागपूर : वाढवण बंदर हे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असणार आहे. या बंदराचा विकास करतांना स्थानिक मच्छिमार, शेतकरी यांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक तो निधी व यंत्रणा उपलब्ध करुन देण्याबरोबरच स्थानिकांचे सर्व प्रश्न चर्चेतून सोडविणार, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिले. वाढवण (जि. पालघर) बंदरात स्थानिक शेतकरी व मच्छिमारांचा विरोध होत असल्याबाबत सदस्य कपिल पाटील, सचिन अहिर, विलास पोतनीस आणि सुनिल शिंदे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना श्री. फडणवीस बोलत होते. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, म्हणून जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणामार्फत वाढवण बंदर हे मोठे बंदर म्हणून विकसित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. पर्यावरण अभ्यास, मासेमारीवरील परिणाम आदी संदर्भात जेएपीएमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांचा निर्णय लक्षात घेऊन बंदर प्रकल्पाबाबत योग्य तो निर्णय घेण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. मासेमारी करण्याकरीता अत्याधुनिक फिशिंग हार्बर तयार करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. याव्यतिरिक्त मच्छिमारांसाठी विशेष योजना राबविण्यात येतील. या योजनांच्या माध्यमातून मच्छिमारांना अत्याधुनिक साधनसामुग्री उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच मासेमारी वाढविण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. यावेळी सदस्य सर्वश्री जयंत पाटील यांनी चर्चेत सहभाग घेतला.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

26 DECEMBER 2022 TO 01 JANUARY 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 12/24/2022 10:17 PM Page 1



# संवादातून वाद मिटवण्यासाठी जणसंवाद अभियान-पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील



**वाडा/प्रतिनिधी**

समान्य नागरिकांच्या मनातील पोलिसांबाबत असलेले गैरसमज दूर व्हावे, महिला, मुली व मुलांना त्यांचे हक्क व अधिकारांची माहिती मिळावी व घराघरत, गाव पाड्यात होणारे वाद मिटावे यासाठी जणसंवाद अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत असून आपसातील वाद मिटविण्याचे काम जणसंवाद अभियानातून होत असल्याचे मत पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. ते असनस येथील बाळकृष्ण यादव पाटील विद्यालयात जनसंवाद अभियानांतर्गत कार्यक्रमात विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करत होते. बुधवारी (दि.२१ डिसेंबर) वाडा तालुक्यातील असनस येथील बाळकृष्ण यादव पाटील विद्यालय येथे वाडा पोलीस ठाणे व एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जनसंवाद अभियान निमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाद, समस्या मिटविण्यासाठी व कायदेविषयक जनजागृती करण्यासाठी एक गाव एक पोलीस संकल्पना राबविण्यात येत असून आपल्या समस्या, तक्रारी या पोलिसांना सांगा, त्यांची मदत घ्या असे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी आपल्या प्रस्थाविक भाषणातून केले. मुंबई येथील एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे प्राचार्य अमेय महाजन यांनीही मार्गदर्शन केले. तर एस.एन.डी.टी. विद्यापीठाच्या विद्यार्थिनींनी पथनाट्य सादर करून कायदेविषयक जनजागृती केली. याप्रसंगी पोलीस कार्यात सहकार्य करणाऱ्या पोलीस पाटील व सामन्य नागरिकांचा बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बाळकृष्ण यादव पाटील विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी लेझीम व ढोल, ताश्याच्या ठेक्यावर उत्कृष्ट नाच करून पाहुण्यांचे स्वागत व मनोरंजन केले. याप्रसंगी पोलीस निरीक्षक जी.डी.तारगे, पल्लवी बाणे, हिम्मतराव सरगर, चंद्रकांत हाके, कॉन्स्टेबल बाबासाहेब घुगे, गजानन जाधव, राजू पोटे, चेतन सोनवणे यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी व शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# राज्यस्तरीय दंत परिषदेत डॉ. पुनम कांदे यांच्या केस रिपोर्टला प्रथम पारितोषिक!



**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय दंत परिषदेच्या वतीने ६१ वी तीन दिवशीय राज्यस्तरीय परिषद नुकतीच अमरावती येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील माईर्स एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील एम. डी. एस. दंत परिवेष्ठन अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. पुनम संपत कांदे यांनी सादर केलेल्या केस रिपोर्ट ला प्रथम पारितोषीक मिळाले तर डॉ. शितल नागिमे यांनी सादर केलेल्या केस रिपोर्ट ला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे.

या यशाबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते डॉ. पुनम कांदे व डॉ. शितल नागिमे यांचा प्रशस्तीपत्र, शाल व संत ज्ञानेश्र्वर माऊलींची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. ओम बघेले, प्रा. डॉ. गौरी उगले, प्रा. डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. तृप्ती गिरी हे उपस्थित होते. या परिषदेत डॉ. कांदे यांनी परिषदेच्या पहिल्या दिवशी चौथ्या सत्रात विद्यार्थी प्रवर्गात 'स्टर्ज - वेबर सिंड्रोम शी संबंधित हिरड्यांच्या वाढीचे निदान आणि उपचार: एक प्रकरण अहवाल' या विषयावर केस रिपोर्ट सादर केला. त्यांच्या या सादरीकरणास प्रथम पारितोषिक मिळाले. तसेच डॉ. शितल नागिमे यांनी 'रॅडिक्युलर सिस्ट तपासणी आणि उपचार एक प्रकरण अहवाल' या विषयावर सादर केलेल्या केस रिपोर्ट ला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. या साठी प्रा. डॉ. विष्णुदास भंडारी, प्रा. डॉ. ओम बघेले, प्रा. डॉ. गौरी उगले, प्रा. डॉ. राघवेंद्र मेत्री यांचे मार्गदर्शन लाभले. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील एम. डी. एस. दंत परिवेष्ठन अभ्यासक्रमाची विद्यार्थीनी डॉ. अनुषा मठ, डॉ. सुरभी पाटील, डॉ. आशुतोष अगरवाल, डॉ. निकिता पालकर या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपले पोस्टर व केस रिपोर्ट सादर केले. या परिषदेत दंत शास्त्र या विषयाचे राज्यभरातील संशोधक विद्यार्थी व दंत रोग तज्ज्ञ सहभागी झाले होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, उप प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. यतीशकुमार जोशी, डॉ. अमृता केंद्रे, डॉ. मिथीला काकडे यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

# सु.पां. कुलकर्णी यांच्या स्मृती दिनानिमित्त आदरांजली; विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे संस्थापक सु.पां.कुलकर्णी यांच्या ११ व्या स्मृती दिनानिमित्त नुरबाग हॉल येथे शिक्षक संचालित शिक्षण संस्था वाडा, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर व कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, डॉ. शांतीलाल धनजी देवशी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२२ डिसेंबर) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जेष्ठ लेखिका व वीरमाता अनुराधा गोरे यांचे देशासाठी काहीही या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. याप्रसंगी शूरवीरांच्या इतिहाशिक गोष्टी सांगून विद्यार्थ्यांना अवगत करून देत प्रोत्साहित केले. शाळेतील मुलांमध्ये वृक्षारोपण व पर्यावरणाबद्दल आवड निर्माण व्हावी या उद्देशाने जलमित्र डॉ.उज्वलकुमार चव्हाण, जॉइंट कमिशनर इनफोर्समेन्ट डायरेक्टरेट (E.D.) व आयकर मुंबई विभाग यांच्या मार्गदर्शनाने सन २०२१ पासून पर्यावरण संरक्षण, संवर्धन, समर्पण (हरित वाडा) या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत कशिष भोईर प्रथम क्रमांक, तुषार भानुशाली द्वितीय क्रमांक व वैष्णवी थोडगा तृतीय क्रमांक मिळाल्याबद्दल रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तर आपल्या कृतीतून पर्यावरण संवर्धन व संरक्षणासाठी विशेष कार्य केल्या बद्दल विधी आगिवले व तेजश्वी नाईक यांचा पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विरमाता व लेखिका अनुराधा गोरे, सरचिटणीस भरत.जानेफळकर उपकार्याध्यक्ष-फडके सर कोषाध्यक्ष जगदीश चित्ते, सचिव विशाल कुलकर्णी, संचालिका श्रीवाणी नायडू संचालक सुधीर कुळकर्णी प्राचार्य डॉं.खांडेकर सर मुख्याध्यापक संजय महाजन, उपमुख्याध्यापक सूर्यवंशी व जि.जु.पाटील हे उपस्तिथ होते.

# खा. सुधाकर शृंगारे यांनी घेतली केंद्रीय रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर लोकसभा मतदार संघातल्या रेल्वे संदर्भातील अनेक मागण्यांना घेऊन खासदार सुधाकर शृंगारे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची नुकतीच दिल्ली येथे भेट घेतली. या भेटी दरम्यान झालेल्या चर्चेत, मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीची निविदा प्रक्रिया सुरु असून ती जानेवारी अखेर पर्यंत संपेल आणि त्या नंतर नियुक्त करण्यात येणारी कंपनी हि सर्वेक्षणाच्या कामाला सुरुवात करेल अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. विशेष म्हणजे या मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीच्या उदघाटन कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आग्रहपूर्वक निमंत्रित करण्यात येणार असल्याचे अश्र्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. मराठवाड्याचा ड्रिम प्रोजेक्ट असलेल्या या कोच फॅक्टरीमध्ये स्थानिकांना ७० टक्के प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी आश्वासित केले आहे. अशी माहिती लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी दिली आहे. खासदार सुधाकर शृंगारे यांनी नुकतीच दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली या भेटी दरम्यान रेल्वे संदर्भातील अनेक मागण्याबाबत चर्चा झाली आहे. औरंगाबाद-हैदराबाद रेल्वेला पानगाव येथे थांबा देण्यात यावा. पुणे-अमरावती रेल्वेला पानगाव येथे थांबा दयावा. बिदर-लातूर-मुंबई एक्स्प्रेसला मुरुड येथे थांबा देण्यात यावा, या मागण्या करण्यात आल्या आहेत. तर लातूर रेल्वे स्टेशनच्या विस्तारासाठी पिटलाईन उभारणीच्या कामाला मंजुरी देण्यात यावी हि मागणी प्रामुख्याने करण्यात आली आहे. लातूर रेल्वे स्टेशनवर पिटलाईन झाल्या नंतर अनेक रेल्वेगाड्या लातूर मार्गे सुरुवात करणे शक्य होणार आहे. त्यामुळे पिटलाईन बद्दल खासदार सुधाकर शृंगारे यांनी आग्रह धरला आहे. मुंबई रेल्वेला मुरुड येथे थांबा मिळाल्याने मुरुड भागातील जनतेला सोयीचे होणार आहे. तर पानगाव येथे थांबा मिळाल्याने नागरिकांना हैद्राबाद आणि औरंगाबाद, अकोला, अमरावतीकडे जाण्याची सोय होणार आहे. मराठवाडा रेल्वेकोच फॅक्टरीच्या संदर्भात बोलताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सध्या टेंडरिंग प्रोसेस सुरु असून जानेवारी अखेर पर्यंत हि प्रोसेस संपेल आणि त्या नंतर नियुक्त करण्यात येणारी कंपनी हि सर्वेक्षणाचे काम सुरु करेल. नवीन वर्षांत या फॅक्टरी मधून प्रत्यक्ष बोगी निर्मितीला सुरुवात होईल. मराठवाडा रेल्वेकोच फॅक्टरी हा देशातील महत्वाच्या प्रकल्पांपैकी एक आहे, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उदघाटनासाठी आम्ही आग्रहाने निमंत्रित करणार आहोत अशी माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. मराठवाडा कोच फॅक्टरीमध्ये स्थानिकांना नोकरीत प्राधान्य द्यावे या खासदार सुधाकर शृंगारे यांनी केलेल्या मागणीवर स्थानिकांना ७० टक्के प्राधान्य देण्यात येईल असे अश्विनी वैष्णव यांनी आश्वासन दिले आहे.



# भिवंडीत शाळा परिसरात गटार तुंबल्याने सर्वत्र दुर्गंधी!



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छता विभागाच्या कामचुकारपणा मुळे शहरातील अनेक ठिकाणी गटारी तुंबून राहिल्याने गटारी मधील सांडपाणी रस्त्यावर येण्यास सुरुवात झाली आहे.शहरातील नारपोली देवजी नगर या ठिकाणी असलेला महानगरपालिका शाळा क्रमांक ४० व ४३ असून या शाळे जवळील रस्त्यालगतची गटार मागील कित्येक दिवस साफ केली गेली नाही. आणि त्यामुळेच या गटारी मध्ये तुंबलेलं सांडपाणी रस्त्यावर पसरल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. विशेष म्हणजे या महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेमध्ये तब्बल ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.आणि याच ठिकाणी अशा पद्धतीने संपूर्ण दुर्गंधीयुक्त पाणी साचलेला असताना परिसरात कचऱ्याची ठीग पडलेले आहेत. आणि या सर्व गोष्टींकडे महानगरपालिका स्वच्छता विभाग यांच्या कडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने स्थानिकांच्या आरोग्य समस्या उदभवत असल्याचे सांगत स्थानिक माजी नगरसेविका साखराताई बगाडे यांनी, महापालिका आरोग्य विभागात या बाबत तक्रार करून सुध्दा प्रशासन कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने पालिका नागरिकांच्या व विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप केला आहे.

# विद्यार्थिनींनी निर्भीडपणे पोलिसां सोबत संवाद साधावा - पो.निरी.दशरथ पाटील




**वाडा/प्रतिनिधी**

मागील काही काळात तरुणींनी केलेल्या आत्महत्या, अमिषाला बळी पडून अल्पवयीन असताना पळून जाऊन लग्न करणे, माता होने असे प्रकार निव्वळ कायद्याची योग्य माहिती नसल्यामुळे होत असतात यासाठी जनसंवाद अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले जात आहे. त्याचा सदुपयोग करून विद्यार्थिनींनी निर्भीडपणे पोलिसां सोबत संवाद साधावा असे आवाहन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले की शिक्षणाचा ध्यास मनी बाळगून अभ्यास करा, व्यसनांपासून दूर रहा, शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करा, काही अडचणी उद्भवल्या तर महिला पोलिसांशी संपर्क करा. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून जनसंवाद अभियान राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने वाडा तालुक्यातील पोशेरी येथील बा.ल.शिंगडा माध्यमिक विद्यालयात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक दशरथ यांनी यांच्यासह संस्थेचे सचिव सचिन शिंगडा, एस.एन. डी. टी. महिला विद्यापीठाचे प्राचार्य अमेय महाजन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सरपंच प्राजक्ता शिंगडा, पर्यवेक्षक गौरी पगारे, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकात हाके, उपनिरीक्षक पल्लवी बाणे, पोलीस कॉन्स्टेबल गजानन जाधव, बाबासाहेब घुगे, चेतन सोनावने, समाजसेवक विशाल ठाकरे, शशिकांत ठाकरे शिक्षिका सरला नेरकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीनाथ अहिरे यांनी केले तर मुख्याध्यापक रविंद्र जाधव यांनी आभार व्यक्त केले.

# कल्याण पूर्वेतून ३२ वर्षीय मतीमंद व्यक्ती बेपत्ता!



कल्याण : कल्याण पूर्वेतील हनुमान नगर मधून अनिल उर्फ सोनू कटारनवरे या ३२ वर्षीय मतीमंद व्यक्ती बेप्पता झाला असून त्याचा अद्यापही शोध लागला नाहीये. ३२ वर्षीय मतिमंद असलेला अनिल कटार नवरे हा शनिवारी दुपारी ४ च्या सुमारास आईस्क्रीम खाण्यासाठी घराजवळील दुकानात गेला होता. बराच वेळ झाला घरी न आल्याने चौकशी केली असता दुकानदाराने तो रिक्षात बसून निघून गेल्याची माहिती दिली त्यानुसार कोळशेवाडी पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली नोंदणी प्रमाणे अंगकाठी मजबूत, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे बरीक, हरवलेल्या वेळी अंगात घातलेले कपडे नेसूस पांढऱ्या व ब्राऊन रंगाचा टी शर्ट व रंगबिरंगी पेन्ट घातलेली, भाषा मतीमंद असल्यमुळे बोलता येत नाही असे सोनू याचे वर्णन आहे तरी तो कुठे हि निदर्शनास आढळल्यास ९९८७२२९२०३ ह्या क्रमांकावर संपर्क साधावा.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'डी' आचोळे, नालासोपारा (पु.)**

**(दुरध्वनी क्रमांक ७२१९३७०००६/७२१९३७०००९)**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'डी' कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-०४ | २३७/४२ | ३१७१ | सुर्यकांत माळी | सविता सुदेश गणवे |
| २. | आचोळे-०१ | १६८/६३ | ३१७२ | रेखा डी. कामदार | अरुण पदमशी गोगरी व जिग्रा अरुण गोगरी |
| ३. | आचोळे-०६ | ३९/३९ | ३१७३ | अनंत शंकर अडीवरकर | एकनाथ शंकर बेलनेकर |
| ४. | आचोळे-१० | ४९४/१२ | ३१७४ | श्याम जी | बिंदु सतिशचंद्र राय व दीपिका सुधीर राय |
| ५. | माणिकपूर २/२ | AC२०/३६०२८ | ३१७७ | विनोद एफ जयस्वाल | झुबेदा के. अहमद कासरगोड |
| ६. | आचोळे ९/२ | ६०१/३४ | ३१७८ | रेखा चुन्नीलाल चौधरी | गंगाधर शिवराम पवार |
| ७. | माणिकपूर २/२ | AC२०/४७३७७ | ३१७९ | योगेश वाय व्यास | शशिकला शशिकांत लगली |
| ८. | आचोळे-१० | ३२८/२१ | ३१८० | अलोक रॉय | लिमा एडविन नायडू व एस. एडविन नायडू |
| ९. | आचोळे-०४ | २०७/१८ | ३१८१ | दत्ताराम सहदेव मोरे | रेणुका सुनिल पाटील |
| १०. | आचोळे-०४ | २४१/१० | ३१८२ | नफिसा शब्बीर एच. बोहरा | शोभना विलास खाखरोडिया व विलास त्रिकमभाई खाखरोडिया |
| ११. | आचोळे ९/२ | ६३१/११ | ३१८३ | सपना एन. पांचाल | दीपिका किरण वणेल व किरण दुदाभाई वणेल |
| १२. | आचोळे-०९ | ६४५/१९ | ३१८४ | दिया डेव्हलपर्स | रुपा लक्ष्मण सिंह |
| १३. | आचोळे-०४ | २५१/४७ | ३१८५ | मोहंत कृष्णपद सामंत | विनीता बीरेशकुमार झा |
| १४. | आचोळे-०४ | ४/४१ | ३१८६ | अकबर अली ईस्माईल मसालावाला | खैरुन्निसा नरुद्दीन काचवाला |
| १५. | आचोळे ९/१ | ४९६/३२ | ३१८७ | विनय सी सिंग | अनिता कृष्णकुमार पाण्डेय व कृष्णकुमार पाण्डेय |
| १६. | आचोळे-०२ | २९२/११ | ३१९७ | पांडुरंग अर्जून शिरगांवकर | दिलीप भानू गोठनकर |
| १७. | माणिकपूर २/२ | AC२०/३६७७९ | ३१९९ | आशुतोष तिवारी | आफताब आलम जमालउद्दीन मोहम्मद |
| १८. | आचोळे ९/१ | ६६९/१३२ | ३२०२ | अल्पा प्रदिप राठोड | नागेंद्र कुमार यादव |
| १९. | आचोळे-१० | ३४२/४९ | ३२०५ | दिपक तिवारी | रविप्रकाश रामजीत यादव |
| २०. | आचोळे-०२ | ३०३/७९ | ३२०६ | बापु कृष्णा तावडे | मनीषा मनोज खेडेकर |

जावक क्र. वविशम/कवि/३१७५२/२०२२-२०२३

दिनांक : २३/१२/२०२२

सही/-

**सहा.आयुक्त**

प्रभाग समिती 'डी' आचोळे

वसई विरार शहर महानगरपालिका

26 DECEMBER 2022 TO 01 JANUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/24/2022 10:18 PM Page 1



# लातूर स्टेशनवर तिरुपती रेल्वेचे उत्साहात स्वागत!

**लातूर/प्रतिनिधी**

तिरुपती बालाजी देवस्थानकडे जाणाऱ्या भाविकांसाठी लातूर मार्गे नवीन साप्ताहिक रेल्वे गाडी सोडण्यात आली आहे. लातूरहून तिरुपतीसाठी रेल्वेगाडी सोडण्यात यावी अशी गेल्या अनेक वर्षांपासून लातूरकरांची मागणी होती. या मागणीला लक्षात घेऊन खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्यासह रेल्वे प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी करीत पाठपुरावा केला होता, आता या पाठपुराव्याला यश आले असून गुरुवार पासून हि रेल्वे सुरुवात करण्यात आली आहे . लातूर लोकसभा मतदार संघातील प्रवाश्यांची सोय व्हावी या दृष्टीने हि रेल्वेगाडी खासदार सुधाकर शृंगारे यांनी लातूर, लातूररोड, उदगीर मार्गे सुरुवात करण्याची मागणी केली होती. पहाटे लातूर रेल्वे स्थानकावर तिरुपती रेल्वेचे नागरिकांनी फटाके वाजवत,फुलांनी रेल्वे इंजिनची सजावट करीत स्वागत केले. यावेळी रेल्वेचे पायलट आणि को-पायलटचेही पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांच्या हस्ते हिरवा



झेंडा दाखवत हि गाडी तिरुपतीकडे मार्गस्थ करण्यात आली. यावेळी भाजपाच्या प्रवक्त्या प्रेरणा होनराव, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य शामसुंदर मानधना, बाबा गायकवाड, विजय अवचारे, अनिल कबाडे, संजय सोनकांबळे, शैलेश भडीकर, अतिश कांबळे, सिद्धांत शृंगारे, अभिजित पालमवाड, बद्रीनाथ मंत्री, हे प्रामुख्याने उपस्थित होते. याबाबत मध्यरेल्वे सल्लागार समितीचे सदस्य शामसुंदर मानधना यांनी दिलेली माहिती अशी कि, १५ डिसेंबर२०२२ ते १७ फेब्रुवारी २०२३ दरम्यान सोलापूर-लातूर-उदगीर-बिदर-कलबुर्गी मार्गे तिरुपती हि साप्ताहिक विशेष रेल्वगाडी गुरुवारपासून सुरुवात करण्यात आली आहे. लातूरवरून तिरुपतीसाठी रेल्वेगाडी सोडण्यात यावी अशी गेल्या अनेक वर्षांपासूनची लातूरकरांची मागणी होती, या मागणीला लक्षात घेऊन खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वेमंत्री अश्रिवनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्यासह प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी करीत पाठपुरावा केला होता. याशिवाय रेल्वे विभागाच्या बैठकांमध्ये खासदार सुधाकर शृंगारे यांनी वेळोवेळी तिरुपती गाडीची मागणी केली होती. लातूर जिल्ह्यासह लोहा, कंधार, मुखेड या भागातून तिरुपती बालाजी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची गर्दी मोठी आहे, हि गाडी सुरुवात करण्यात आल्याने भाविकांना सोयीचे होणार आहे, जास्तीत जास्त भाविकांनी या गाडीने प्रवास करावा म्हणजे प्रायोगिक तत्वावर सुरुवात करण्यात आलेल्या या गाडीच्या फेऱ्या वाढवता येतील. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी प्रतिसाद दिल्यास हि रेल्वे गाडी नियमित करण्यास पाठपुरावा करता येईल, असे आवाहन खासदार सुधाकर शृंगारे यांनी केले आहे. सोलापूर- लातूर-बिदर-कलबुर्गी-तिरुपती या रेल्वेगाडीचा क्रमांक-०१४३७ असून हि रेल्वेगाडी सोलापूर येथून दर गुरुवारी रात्री ९ वाजून ४० मिनिटांनी सुटेल आणि लातूर स्टेशनवर हि गाडी शुक्रवारी पहाटे २ वाजून ३० मिनिटांनी येऊन २.३५ला उदगीरकडे मार्गस्थं होईल. सोलापूर, कुर्डुवाडी, बार्शी, उस्मानाबाद, लातूर, लातूररोड, उदगीर, भालकी, बिदर, हुमनाबाद, कलबुर्गी, वाडी मार्गे तिरुपतीला शुक्रवारीच रात्री ७ वाजून ४५ मिनिटांनी पोहचेल. परतीच्या प्रवासात त्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी रात्री ९ वाजून १० मिनिटांनी तिरुपतीहून लातूर मार्गे,सोलापूरकडे निघेल. परतीच्या प्रवासात या गाडीचा क्रमांक ०१४३८ असेल.

# वुशू क्रीडा स्पर्धेत महात्मा बसेश्वरचा मनीष जानवळकर सर्वप्रथम!



**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विदयार्थी मनीष जानवळकर याने नुकत्याच नांदेड येथे झालेल्या विभागीय वुशू क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आहे त्याबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांत उटगे आणि सदस्य अशोक उपासे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य बी.एम.जाधव, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.विजयकुमार सोनी, डॉ. गुणवंत बिराजदार, रासेयोचे विभागीय समन्वयक डॉ.संजय गवई, प्रा.आशिष क्षीरसागर आणि विष्णू तातपुरे आदीची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य क्रीडा संचनालय, पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ४० किलो वजन गटामध्ये विभागीय वुशू क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये अनेक खेळाडू सहभागी झाले होते यात मनीष जानवळकर याने नेत्रदीपक कामगिरी केली म्हणून त्याचे महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि खेळाडू यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे.

# वाडा येथे राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जनजागृती अभियान मेळावा संपन्न

**वाडा/प्रतिनीधी**

ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रकार वारंवार काणी पडतात मात्र ही फसवणूक होऊ नये किंवा झालीच तर काय करावे याबाबतचे मार्गदर्शन होने अत्यावश्यक असल्याने शनिवारी (दि.२४ डिसेंबर) वाड्यातील डॉ. शांतीलाल धनजी देवाशी कला महाविद्यालय आणि वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहक (उपभोगता) संरक्षण समिती पालघर जिल्हा यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी प्रवास ग्राहक (उपभोगता) संरक्षण समिती पालघर जिल्हा अध्यक्षा भारती पाटील उपस्थित होत्या. त्यांनी ग्राहकांना उद्भवणाऱ्या विविध समस्या सांगून त्याचे निरसन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. ऑनलाईन, ऑफलाईन फसवणुकी पासून सावध राहण्यास व फसवणूक झालीच तर ग्राहक (उपभोगता) संरक्षण समितीच्या पदाधिकारी किंवा सदस्यांना भेटून आपली तक्रार सांगण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे सचिव विशाल कुलकर्णी, पत्रकार अँड. निहेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रियांका महाले, निलेश पाटील, करुणा पाटील, सचिन गायकवाड, विनोद वाघचौरे, महाले आई, यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# विभागीय शालेय कॅरम स्पर्धेत जैंन स्पोर्टस ॲकॅडमीचा यश धोंगडे प्रथम
## जैंन स्पोर्टस अक्ॅडमीचे अबजुर अन्सारी द्वितीय तर महमंद हमजा पाचव्या स्थानी

**जळगाव/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व धुळे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय शालेय कॅरम स्पर्धेत मुलांच्या १४ वर्षे वयोगटात जैन स्पोर्ट्स ॲकॅडमीमधील कॅरमपटू यश योगेश धोंगडे याने प्रथम, तर महमंद हमजा द्वितीय व पाचवे स्थान प्राप्त करीत विभागीय कॅरम स्पर्धेत आपले वर्चस्व सिद्ध केले. १४ वर्षे वयोगटातील विभागीय कॅरम स्पर्धा धुळे क्रीडा संकुल येथे १६ डिसेंबर ला झाल्यात. या स्पर्धेत १४ वर्षे जैन स्पोर्ट्स ॲकॅड्मी व आर. आर. विद्यालयाचा विद्यार्थी यश योगेश धोंगडे याने धुळे येथील अबुजर अन्सारी या अंतिम फेरीत २५-० असा सरळ पराभव करीत विजेतेपद प्राप्त केले. अबुजर अन्सारीला



उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. यश धोंगडे याने आपल्या खेळ कौशल्याच्या जोरावर स्पर्धेत शेवटपर्यत आपली पकड कायम ठेवली. त्याने उपान्त फेरीत जैन स्पोर्ट्स ॲकॅडमी व जि. एच. रायसोनीच्या कार्तिक हिरे याचा देखील २५-४ असा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला होता. सदर १४ वर्षे वयोगात जळगाव, धुळे, नाशिक, नंदुरबार विभागातील ४८ कॅरमपटूंनी सहभाग घेतला होता. त्यात जळगाव येथीन जैन स्पोर्टस ॲक्डमीतील योगेश घोंगडे, कार्तिक हिरे तृत्तीय तर महमंद हमजा पाचवे स्थान प्राप्त करून प्रथमच प्रथम, विभागीय स्पर्धेत जळगावचे नाव रोशन केले. वरील सर्व यशस्वी जळगाव येथील कॅरमपटूंना घडविण्याचे व यशस्वतिपर्यत पोहचविण्याचे कार्य कॅडमीतील प्रशिक्षक योगेश धोंगडे व सय्यद मोहसनी यांनी लिलया पेलले. विजयी खेळांडूपैकी यश योगश धोंगडे याला धुळे कॅरम संघटनेतर्फे ट्रॉफी देऊन विशेष कौतुक व गौरविण्यात आले. जैन स्पोर्ट्स ॲक्डमीतीक विभागीय स्पर्धेत स्थान प्राप्त करणाऱ्या यश, कार्तिक, हमजा या खेळाडूंचे अभिनंदन जैन स्पोर्टस ॲक्डमीचे अतुल जैन, अरविंद देशपांडे यांनी केले व राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छाही दिल्यात.

पान १ वरून...

## बारबालेचं स्वप्नमहाल अखेर...

महिलेची पाहणी करून सविस्तर पंचनामा केला.आणि प्रेत शवविच्छेदनसाठी रवाना केला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क. २८२ / २०२२ भादवि कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. एखाद्या महिलेची अशाप्रकारे निर्घुन हत्या करून प्रेत फेकुन देणे या गंभीर गुन्हयाची तात्काळ उकल करणेबाबत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह. पोलीस आयुक्त संजय मोहिते, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये, व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) अमित काळे यांनी आदेश दिले होते. गुन्हयाचे घटनास्थळ हे निर्जन ठिकाणी होते.त्या ठिकाणी कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा सीसीटिव्हि फुटेज नव्हते . त्यामुळे सदरचा गुन्हा उघडकीस आणने हे पोलीसांना अतिशय आव्हानात्मक होते. या गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पनवेल गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल च्या पथकाने मृत महिलेच्या प्रेतावरील वस्तूंचे बारकाईने निरीक्षण केले. गुन्हयाच्या घटनास्थळावरील परिस्थितीजन्य पुरावे व इतर भौतीक दुवे याची तत्परतेने माहिती घेतली. तत्परतेने केलेल्या निरीक्षणाचे विश्लेषण केले व पुढील तपास तात्काळ सुरू केला. पथकाने आहेरात्र मेहनत घेवून नवी मुंबई, मुंबई, ठाणे परिसरातील हरवेलेल्या महिलांचा शोध घेतला.परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. भौतिक पुराव्याचे दृष्टीने मिळालेल्या वस्तूवरून एका विशिष्ट ब्रॅन्डच्या घातलेल्या सँडल चप्पल वरून शोध घेण्यात आला. या महिलेने घातलेली नवीन ब्रँडेड चप्पल कुठे भेटते या दुकानाची माहिती पोलिसांनी काढली. यानंतर दुकानाचे सिसिटीव्ही तपासले. विकत घेतलेल्या दुकानाच्या आसपासचा परिसर पोलिसांनी पिंजून काढला. तांत्रिक तपास करून महिलेचे सोबत असलेल्या इसमाची ओळख पटवण्यात आली. आरोपी हा बॉडी बिल्डर असल्याचे निदर्शनास आले. यावरून सर्व जिममध्ये माहिती घेतली असता तो नवी मुंबई घणसोली येथील एका जिम मध्ये ट्रेनर म्हणून काम करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष २ च्या पथकाने सापळा लावुन संशयित आरोपी रियाज समद खान (वय ३६) याला चौकशीसाठी ताब्यात घेतले तसेच त्याच्या मोबाईल क्रमांकावरून त्याच्या दुसऱ्या साथीदाराचा देखील सुगावा लागला. इम्रान इस्माईल शेख (वय २८)असे त्याचे नाव . या दोघांना मोठ्या शिताफिने ताब्यात घेतले आणि त्यांना गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्यांची कसून चौकशी केली मात्र ते काही बोलत नव्हते. पोलिसांनी या दोघांना विश्वासात घेऊन अखेर त्यांना बोलते केले. रियाज समद खान हा पेशाने जीम ट्रेनर असून तो रूम नं ५०६, पाचवा माळा, बिल्डींग ने २६, म्हाडा कॉलनी, गौतम नगर, देवनार या ठिकाणी राहत होता. तो उर्वशी सत्यनारायण वैष्णव (वय २७) या कोपरखैरने येथील तरुणीच्या प्रेमात पडला होता. उर्वशी ही नेरुळ येथील एका बार मध्ये काम करत होती.रियाज खान या बार मध्ये जात असल्याने त्याची तिच्या सोबत ओळख झाली. पुढे ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. दोघेही प्रेमाच्या धुंदीत मौजमजा करू लागले. कालांतराने उर्वशीने रियाजकडे लग्नाचा विषय काढला. मात्र तो आधीच विवाहित असल्याने तो तिला टाळू लागला. परंतु उर्वशी ऐकत नव्हती. त्यामुळे रियाजला राग आला.अखेर त्याने आपला मित्र इम्रान इस्माईल शेख याच्या मदतीने उर्वशी हिचा खून करण्याचा बेत आखला. उर्वशी हीला फिरायला घेऊन जाण्याचा बहाण्याने तिला लाल रंगाचे बलेनो कार मध्ये बसविले. ती गाडी घेऊन ते पनवेल मार्गी धामणी गावाकडे निघाले. वाटतच तिचा रस्सीने गळा आवळुन खुन केला. दोघानी मृतदेहाची विल्हेवाट लावणेसाठी मृतदेह धामणी येथे गाढी नदीचे पुलावरून फेकुन दिला .अशा प्रकारे तिच्या प्रेताची विल्हेवाट लावली. अशी कबुली या दोघांनी दिली. गुन्हे शाखेच्या पथकाने या दोन्ही आरोपीना पुढील तपासकामी पनवेल तालुका पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे. ही उल्लेखनिय कामगिरी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाची सपोनि प्रविण फडतरे, संदिप गायकवाड, पोलिस उप निरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील, सुदाम पाटील, पो. हवा. प्रशांत काटकर, दिपक डोंगरे, रणजित पाटील, सचिन पाटील, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकराम सुर्यवंशी, अजित पाटील, जगदिश तांडेल, ज्ञानेश्वर वाघ, इंद्रजित कानु, रूपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, सागर रसाळ, पो.ना. अजिनाथ फुंदे, प्रफुल मोरे, नंदकुमार ढगे, अभय मेन्या, पो.शि. संजत पाटील, विक्रांत माळी यांनी केली आहे.

## एकतर्फी प्रेमातून खून करून...

यावेळी आरोपी दुर्गाप्रसाद रहांगडालेने पिडितेला रस्त्यात अडवून मी तुझ्यावर प्रेम करतो माझ्याशी लग्नकर अशी मागणी केली. मात्र पिडीतेने नकार दिल्याने आरोपीने तिच्या डोक्यात हातोडयाने वारा केले व गळयावर ब्लेडने वार करून तिला जागीच ठार केले. एवढेच नव्हेतर स्वत:वर सुद्धा ब्लेडने वार करून संपवण्याचा प्रयत्न केला होता. याप्रसंगी शेतात मोटारपंप दुरूस्त करीत असलेल्या लोकांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. रावणवाडी पोलिसांनी भादंवि कलम ३०२, ३०९ अंतर्गत गुन्हा नोंद केला होता. पोलिसांनी आरोपी कडून हत्यारे जप्त करत न्यायालयात सर्व पुरावे दाखल केले होते. न्यालयातील सरकार पक्षाकडून विशेष तथा अतिरिक्त सरकारी वकील कृष्णा पारधी यांनी आरोपी विरुद्ध पुरावे व ९ साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

पान ८ वरून...

## भिवंडीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर...

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने असलेल्या या ग्रंथालयाकडे मनपा प्रशासनाने दुर्लक्ष केले असून इमारत धोकादायक झाल्याने कारण पुढे करत ग्रंथालयाच्या सोयी सुविधानकडे दुर्लक्ष केले आहे.या ग्रंथालयात सुमारे ५४ हजार पुस्तके आहेत मात्र पुस्तके ठेवण्यासाठी प्रशस्त कपाट व फर्निचर व योग्य त्या सोइ सुविधा नसल्याने ग्रंथालयातील हजारो पुस्तके खराब झाली असून हि अडगळीत पडली आहेत.या ग्रंथालयात मागील अनेक वर्षापासून औषध फवारणी देखील करण्यात अली नसून सिसिटीव्ही कॅमेऱ्यांचा देखील अभाव आहे. भिवंडीतील मुख्य ग्रंथालय असलेल्या या ग्रंथालयात यूपीएससी एमपीएससी व इतर प्रशासकीय सेवांच्या अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची सध्या प्रचंड गैरसोय होत असून ग्रंथालयातील कोंदट वातावरणात विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागत असून घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने असलेल्या या मुख्य ग्रंथालयाच्या इमारतीकडे व सोसीसुविधांकडे मनपा प्रशासन आतातरी लक्ष देणार का किंबहुना विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी मनपा पर्यायी व्यवस्था करणार का हाच खरा प्रश्न आहे.

## 'कोणी बायको देता का कोणी पामराला'...

दिशेने कूच केली. जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन ही नवरदेव मंडळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

**मुलींची संख्या कमी होण्यामागे**
**सरकार जबाबदर -रमेश बारस्कर**

तरुणांचं वय २५, ३०, ३५, ४० वर्षे होऊनही त्यांची लग्न झालेली नाहीत. त्यांच्या आईवडिलांची परिस्थिती चांगली नाही. कोणाला अटॅक येतो, कोणाला शुगर आहे, कोणाला बीपीचा त्रास होतोय. केरळमध्ये १ हजार मुलांमागे १०५० मुली आहेत, भारतात १ हजार मुलांमागे ९४० मुली आहेत आणि महाराष्ट्रात १ हजार मुलांमागे ८८९ मुली आहेत. ही तफावत मुलीची हत्या केल्या, मुली नाकारल्यामुळे आहे. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असून यासाठी सरकार जबाबदार आहे, असा आरोप रमेश बारस्कर यांनी केला.

## रस्ता सुरक्षेसाठी सोलापूर उपप्रादेशिक ...

परिवहन कार्यालयाने रबविलेला हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्याचा मनोदय जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी यावेळी आपल्या भाषणातून व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय तिराणकर, अमरसिंह गवारे तसेच मोटार वाहन निरीक्षक यांनी परिश्रम घेतले. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड व नवनियुक्त सहायक मोटार वाहन निरीक्षकांच्या संकल्पनेतून साकारलेला हा 'सुरक्षा कवच' रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी दिशादर्शक ठरेल अशी भावना उपस्थितांनी याप्रसंगी व्यक्त केली.

## वसईच्या खेळाडूंची एशियन ...

मिळविले तसेच 'लाईट कॉन्टॅक्ट' क्रिडाप्रकारात आपले दुसरे रौप्यपदक पटकाविले. देशासाठी १ सुवर्ण व २ रौप्य पदक प्राप्त करत भार्गवी हिने ह्या स्पर्धेत आपली पूर्ण छाप उमटविली. तर वसईची दुसरी कन्या सायली कान्हत हिने किक लाईट क्रिडाप्रकारात सिनियर गटात -५५ किलो वजनी गटात कास्य पदक मिळवीत आपली छाप उमटविली. वसईतील सिनियर कोच सूर्यप्रकाश मुंडापाट सर ह्यांचीदेखील एशियन किक बॉक्सिंग स्पर्धेत रेफ्री म्हणून नियुक्ती झाली होती. आंतरराष्ट्रीय स्तरावर रेफ्री म्हणून कामगिरी पार पाडत असताना सरांचे मोलाचे मार्गदर्शन खेळाडूंना लाभले. ज्यांचे नेहमी मार्गदर्शन पालघर जिल्ह्यातील किक बॉक्सर्सला लाभते असे पालघर डिस्ट्रिक्ट किकबॉक्सिंग असोसिएशनचे चीफ पेट्रोन श्री आफिफ शेख ह्यांनी खेळाडूंच्या ह्या उल्लेखनीय कामगिरीवर आनंद व्यक्त करताना खूप साऱ्या शुभेच्छा खेळाडूंना दिल्या. भार्गवी हिने केलेल्या ह्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल तिच्याशी संपर्क साधला असता, मी माझ्या देशासाठी काही करू शकले ह्याविषयी अभिमान वाटत असल्याचे बोलत पुन्हा एकदा आपले गुरुवर्य, पालक, तसेच खेळास व खेळाडूस सदैव साथ देणारी वसईचे लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर व वसई विरारची तमाम जनता ह्याचे आभार मानले. पुढील येणाऱ्या स्पर्धामध्ये अजून चांगली कामगिरी करेन असा विश्वासही तिने दाखवला. भार्गवी व सायली ह्यांच्या चमकदार कामगिरी बद्दल भार्गवी व सायली ह्याच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत असून त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा मिळत आहेत.

## देव आणि देशसेवा जीवनाचा अविभाज्य..

होण्यासाठी भारतभूमी काहीतरी चांगले कार्य करण्याची प्रेरणा सतत देत असते. देशाची प्रगती व्हावयाची असेल तर स्वतःची प्रगती होणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करावे. ध्येय निश्चित करीत असताना आई-वडिलांनी मुलांना मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमता ओळखून त्यांचा विकास करावा. त्याच्या मदतीने समाजसेवेचे व्रत हाती घ्यावे.असे माई म्हणाल्या. प.पू.रामप्रियाश्रीजी यांनी पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे काका यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जितेश चापसी, धनंजय कुलकर्णी तुंगीकर, नितीनभाऊ शेटे, प्रदीप कुलकर्णी, शिवाजीराव हेंडगे, वर्षा डोईफोडे, मंजिरी जोशी, मनिषा टोपरे व मान्यवर उपस्थित होते. कथेनंतर श्री व सौ.डोईफोडे यांच्यासह उपस्थित मान्यवर व पालकांच्या हस्ते भारतमातेची आरती करण्यात आली. आरतीसाठी उपस्थित राष्ट्रभक्ती सत्संगास संस्थेचे पदाधिकारी, शिबिरात सहभागी झालेले विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गोव्यात मायमराठीचा जागर...

आनंद घेतला. कोकण मराठी परिषद, गोवा चे अध्यक्ष, शेकोटी साहित्य संमेलनाचे आयोजक सुदेश आर्लेकर, उद्घाटक प्रा.विनय बापट, संमेलनाध्यक्ष नांदेड येथील ज्येष्ठ साहित्यिक मा.देविदास फुलारी, प्रमुख वक्ते अहमदनगर येथील डॉं.संजय बोरूडे यांची चिंतनशील मांडणी उत्तम.विविध सत्राचे आयोजन... प्रभाळकर साळेगावकर , सतिश लळित, आरती टोपले, माधव फुलारी, मुकूंद मुळिक, संजय बोरूडे, बापू दासरी, शंकर वाडेवाले, शैलजा कारंडे, डॉ. क्रांती मोरे, कवी निशीगंध, राज थळपदे, कृष्णा कांबळे, रचना, प्रा.नयन राजमाने इ. अनेक मान्यवर उपस्थित होते. समारोप सत्रात संमेलन अध्यक्ष देवीदास फुलारी सरांनी उत्तम मांडणी केली., प्रमुख पाहुण्या प्रा.नयन भादुले-राजमाने यांनी महाराष्ट्रातील साहित्य परंपरेवर प्रकाश टाकताना लातूर मधील साहित्य क्षेत्रातील मान्यवरांच्या विशेष बाबीवर प्रकाश टाकला.साहित्य चळवळींची दखल घेतली.संमेलनाच्या आयोजकांचे हार्दिक अभिनंदन केले तसेच काही गोष्टी सुधारण्याची आवश्यकता नम्रपणे व्यक्त केली. पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा व्यक्त केल्या. कु.अक्षता किनळेकर चे सुत्रसंचालन प्रभावी सूत्रसंचालन केले. शैलजा साळगावकर व अन्य सदस्य यांनी संमेलन यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

## हिंदू आक्रोश मोर्चात लातूरकरांचा ...

प्रणाम आमचा आईला माता मानतो गाईला, जपूया आपली नाजूक कळी नाही जाऊ देणार लव जिहाद ची बळी आणि श्रद्धाला न्याय मिळालाच पाहिजे अशा मागण्यांचे फलक घेऊन लातूरकर मोर्चा सहभागी झाले होते.

26 DECEMBER 2022 TO 01 JANUARY 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 12/24/2022 10:19 PM Page 1



# भिवंडीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची दुरावस्था!

## ना ग्रंथपाल, ना सफाई, ना नवी पुस्तके; इमारतही धोकादायक!






**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची पुरता दुरावस्था झाली आहे. मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षित कारभारामुळे या ग्रंथालायात मागील दोन वर्षापासून ग्रंथपाल नाहीत तसेच येथे सफाई कर्मचारी नसल्यामुळे ग्रंथालयात अक्षरशः धूळ साचली असून हि धूळ साफ करण्यासाठी येथे सफाई कर्मचारी देखील नाही त्यामुळे ग्रंथालयात धुळीचा खच पडला असून विद्यार्थ्यांना कोंदट वातावरणात अभ्यास करावा लागत आहे.तर मागील दोन वर्षापासून कोरोना संकटामळे या ग्रंथालयात नवीन पुस्तके देखील आलेली नाहीत त्यामुळे या वाचनालयात अभ्यासासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असून मनपा प्रशासनाचे या ग्रंथालयातील सोयीसुविधांकडे पुरता दुर्लक्ष झाले आहे.विशेष म्हणजे हि इमारत स्वतः मनपा प्रशासनाने धोकादायक ठरवली असून या पर्यायी जागा उपलब्ध होत नसल्याचे कारण सांगून मनपा प्रशासन या धोकादायक इमारतीतच ग्रंथालय सुरु ठेऊन विदयार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरु केला असून भविसघ्यात दुर्घटना घडल्यास त्यास जबाबदार कोण असा सवाल उपस्थित होत असून मागील दोन तीन वर्षापासून मनपाने ग्रंथालयासाठी पर्यायी व्यवस्था का केली नाही असा सवाल येथे अभ्यास करणारे विद्यार्थी विचारत आहेत.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्म शताब्दीचे औचित्य साधून भिवंडी नगरपरिषदेने १९९१ साली मंडई येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाची स्थापना केली.मात्र अवघ्या ३१ वर्षातच एक मजली असलेल्या या ग्रंथालयाची इमारत धोकादायक झाल्याने हे ग्रंथालय आता अडगळीत पडले आहे.ग्रंथालयाची इमारत धोकादायक असल्याने मनपा प्रशासनाने या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीकडे मागील दोन वर्षापासून दुर्लक्ष केले आहे.२०२०-२१ मध्ये या ग्रंथालयाचे ग्रंथपाल निवृत्त झाल्याने या ग्रंथालयात ग्रंथपालाची अधिकृत नियुक्तीच करण्यात आली नसून येथे असलेली महिला सफाई कामगार देखील निवृत्त झाल्याने या ग्रंथालयाच्या साफ सफाईसाठी कोणीही नसल्याने ग्रंथालयात अक्षरशः धुळीचा खच पडला असून भिंतींवर जाळी व काजळी पसरली आहे.तर भिंती व पिलरला भेगा पडल्या आहेत. देशाचे घटनाकार असलेल्या भारतरत्न ...पान ६ वर

# 'कोणी बायको देता का कोणी पामराला' बाशिंग बांधून घोड्यावर स्वार होत युवकांचा सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**




लग्नासाठी मुलगी देण्याची मागणी करत कोणी बायको देता कोणी असे म्हणत घोडेस्वार होऊन सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला आहे. विवाहासाठी इच्छुक असलेल्या अनेक समाजातील युवकांनी नवरदेवाच्या वेशामध्ये हा मोर्चा काढला. लग्नासाठी मुलगी देण्याची मागणी करत सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढल्याचा प्रकार सोलापुरात घडला आहे. ज्योती क्रांती संघटनेकडून हा मोर्चा काढण्यात आला आहे. गर्भलिंग निदान कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची मागणी मोर्चाचं कारण काहीसं मजेशीर वाटत असलं तरी त्यामागचा उद्देश मात्र गंभीर आहे. महाराष्ट्रात गर्भलिंग निदान कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात मुलींचे प्रमाण कमी होत आहे. परिणामी मुला मुलींचं प्रमाण विषम असल्यामुळे अनेक युवकांना लग्नासाठी मुलगी मिळत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात गर्भलिंग निदान कायद्याची पीसीपीएनडीटी ॲक्ट अंमलबजावणी प्रभावीपणे करावी अशी मागणी मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारस्कर यांच्या माध्यमातून करण्यात आली. लग्न न झालेल्या तरुण मुलांना लग्नासाठी मुलगी देण्याची मागणी करत काही तरुणांनी हा मोर्चा काढला. सोलापुरातील होम मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय असा हा मोर्चा होता. बाशिंग बांधून, नवरदेवाचे वेशात घोड्यावर स्वार होत या युवकांनी हातात 'कोणी मुलीगी देता का मुलगी लग्नासाठी या पामराला', 'बेटी बचाओ', अशा मजकुराचे फलक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ...पान ६ वर

# रस्ता सुरक्षेसाठी सोलापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे 'सुरक्षा कवच'



**सोलापूर/प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन व्हावे यासाठी सोलापूरच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने सुरू केलेल्या 'सुरक्षा कवच' या कक्षाचे उद्घाटन जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते आज दि. २१ डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव उपस्थित होते. रस्ता सुरक्षेची शिकवण ही शालेय वयापासूनच झाली पाहिजे हा सुरक्षा कवच स्थापन करण्यामागचा प्रमुख उद्देश असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी आपल्या प्रस्ताविकातून सांगितले. याप्रसंगी शाळेतील मुलांना भेट म्हणून देण्यात आलेले पेन, डायरी, फ्रेंडशिप बँड, रस्ता सुरक्षा महितीपुस्तिका, टी कप यावर रस्ता सुरक्षेचे संदेश कोरण्यात आलेले आहेत. वही पुस्तकांवर लावण्यात येणाऱ्या स्टिकर्स वरती वाहतुकीच्या नियमांची चिन्हे व क्यू आर कोड छापण्यात आले आहे. क्यू आर कोड स्कॅन केल्यानंतर शाळेतील मुलांना उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने केलेल्या रस्ता सुरक्षेच्या कार्यक्रमाचे व्हिडीओ कार्यालयाच्या युट्यूब चॅनेल https://youtube.com/dyrtosolapur वरती दिसणार आहेत. नव्याने स्थापन केलेल्या रस्ता सुरक्षा कवच मध्ये रस्ता सुरक्षेचे संदेश देणारे विविध मनोरंजनात्मक खेळ उभा केले आहेत. यामध्ये रस्ता सुरक्षेची सापशिडी, रस्ता सुरक्षा ट्री, रोड सेफ्टी ओथ वॉल, रस्ता सुरक्षेची शपथ व प्रतिज्ञा यांचा समावेश करण्यात आला आहे. आपत्कालीन वाहनांना मार्ग द्या याची जनजागृती करणारे मॉडेल कक्षामध्ये कार्यान्वित केले आहे. सुरक्षा कवचची इमारत ही वाहतुकीच्या नियमांच्या चित्रांनी खास रंगविण्यात आली आहे. हेल्मेट व सीट बेल्ट चा वापर करावा यासाठी कक्षाबाहेर सेल्फीपॉइंट उभा करण्यात आला आहे. कार्यालय परिसरातील झाडांवर लावलेले फलक वाहतुकीचे नियम देखील सांगत आहेत. उपप्रादेशिक ...पान ६ वर

# हिंदू आक्रोश मोर्चात लातूरकरांचा प्रचंड प्रतिसाद!




**लातूर/प्रतिनिधी**

लव्ह जिहाद व धर्मांतर विरोधी कायद्याच्या तात्काळ मागणीसाठी समस्त लातूरकरांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या हिंदू आक्रोश मोर्चात लातूरकर प्रचंड प्रतिसाद देत उतरले. आई जगदंबा मंदिर गंजगोलाई येथून सुरू झालेला हा मोर्चा जगदंबा मंदिरामध्ये मातेचे स्मरण करून सुरू करण्यात आला. गंज गोलाईला प्रदक्षिणा मारून हा मोर्चा हनुमान चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये संपला. यावेळी मोर्चात सहभागी झालेल्या सर्व लोकांनी सदैव धर्म रक्षण व धर्मनिष्ठा राखण्याची प्रतिज्ञा घेतली. सोबतच सर्वधर्मसमभाव म्हणत असताना धर्मावर संकट जर येत असेल तर त्याचा प्रतिकार देखील आम्ही तितक्याच ताकदीने करू. तसेच लव्ह जिहाद सारख्या विषयांमध्ये बळी पडलेली आमची माता, भगिनी कधीही घरी येण्याची इच्छा तिला झाल्यास तिला वापस घेऊन आम्ही तिचे पुनर्वसन करण्यासाठी आम्ही तयार आहोत अशी प्रतिज्ञा यावेळी घेतली. या मोर्चादरम्यान सर्व व्यापाऱ्यांनी आपले व्यापार बंद ठेवून मोर्चामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. गांधी चौक, अशोक हॉटेल या भागामध्ये व्यापारी वर्गाच्या वतीने मोर्चातील लोकांसाठी पाण्याचे वाटप करण्यात आले. मोर्चाची सांगता प्रत्यक्ष श्रद्धा अभिनयातून बोलते आणि तिचे व्यथा मांडते आहे अशा माध्यमातून करण्यात आली. तसेच श्रद्धाच्या वडिलांच्या मनातील व्यक्त झालेल्या भावना लोकांसमोर प्रस्तुत करण्यात आल्या. मोर्चाच्या प्रामुख्याने दोन मागण्या होत्या त्या म्हणजे लव्ह जिहाद विरुद्ध कायदा झालाच पाहिजे आणि धर्मांतर विरोधी कायदा झालाच पाहिजे. तसेच अनेक घोषणा मोर्चाच्या दरम्यान देण्यात आल्या. या मोर्चाची प्रमुख मागणी लोकांनी मोर्चात सहभागी होऊन प्रकर्षाने सरकारच्या व जनतेच्या समोर मांडली. तसेच एकता मे जान है! हिंदू देश की शान है, श्रीरामाचे आम्ही हनुमान भारतीय स्त्री आमचा अभिमान, धर्मांतरण विरोधी कायदा झालाच पाहिजे, ...पान ६ वर

# वसईच्या खेळाडूंची एशियन किकबॉक्सिंग चॅम्पियन्सशिप स्पर्धेत सुवर्ण भरारी



**वसई/प्रतिनिधी**

सतत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण कामगिरी करणाऱ्या वसईची भार्गवी संखे व साईली कान्हात ह्या किकबॉक्सर्स खेळाडूंनी एशियन किकबॉक्सींग् स्पर्धेत आपली छाप उमटवत वसईचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे. किकबॉक्सिंग मध्ये राष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या वसईच्या भार्गवी संखे व साईली कन्हात ह्यांची निवड १० ते १८ डिसेंबर २०२२ रोजी बँकॉक, थायलंड इथे होणाऱ्या एशियन किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी झाली. भार्गवीची निवड स्पर्धेत मुझिकल हार्ड स्टाईल, पॉइंट फाईट आणि लाईट कॉन्टॅक्ट ह्या तीन क्रीडा प्रकारा साठी तर सायली कन्हात हीची किक लाईट क्रीडा प्रकारासाठी निवड झाली होती. सातत्यपूर्ण कामगिरी करीत असलेल्या भार्गवी संखे व सायली कन्हात ह्यांनी आपली किकबॉक्सिंग मधील चमक कायम ठेवली. एशियन किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये आशिया खंडातील १९ देशांनी आपला सहभाग नोंदवला होता. आपल्या भारत देशाकडून खेळताना भार्गवी हिने किक बॉक्सिंग मधील मुझिकल हार्ड स्टाईल क्रीडा प्रकारात देशाला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. इतक्यावरच न थांबता सिनियर गटात-६० किलो वजनी गटात 'पॉइंट फाईट' क्रीडा प्रकारात भार्गवी हिने रौप्यपदक ...पान ६ वर

# देव आणि देशसेवा जीवनाचा अविभाज्य भाग झाला पाहिजे -प.पू.रामप्रियाश्रीजी



**लातूर/प्रतिनिधी**

जीवनाची सफलता हवी असल्यास माणसाने देशसेवा व देवसेवेचे व्रत अंगीकारले पाहिजे.यासाठी मनामध्ये जिज्ञासा हवी, ज्या जिज्ञासेतून आपली प्रगती होत असते अशी गुरुकिल्ली म्हणजे जिज्ञासा होय, असे प्रतिपादन प.पू.रामप्रियाश्रीजी (माई)यांनी केले.मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्र चेतना शिबिरात आयोजित ग्रामगीता प्रणित भागवत कथा व राष्ट्रभक्ती सत्संगाच्या दुसऱ्या दिवशी निरूपण करताना रामप्रियाश्रीजी बोलत होत्या.माई म्हणाल्या की, भारतभूमी ही संतांची, महंतांची, सपूतांची भूमी म्हणून ओळखली जाते.आम्ही खूप भाग्यवान आहोत आमचा जन्म या पवित्र भारत भूमीत झाला आहे. स्वतःची ओळख ...पान ६ वर

# गोव्यात मायमराठीचा जागर उत्साहात

## लातूरच्या साहित्यिकांनी जिंकली गोवेकरांची मने




**लातूर/प्रतिनिधी**

१८ वे शेकोटी साहित्य संमेलन, म्हापसा-गोवा येथे घेण्यात आले. कविसंमेलनात निमंत्रित कवयित्री व समारोप सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून लातूरच्या साहित्यिक प्रा.नयन भादुले-राजमाने' साहित्यनयन' यांना निमंत्रण.तसेच कवयित्री शैलजा कारंडे व डॉ. क्रांती मोरे निमंत्रित कवयित्री म्हणून शेकोटी साहित्य संमेलनाला उपस्थित होत्या. म्हापसा येथील बोडगेश्र्वर संस्थान परिसर, लोहिया गार्डन आणि महालक्ष्मी सभागृहात हा उत्सव पार पडला. गोव्यात गेली १८ वर्षे हे आगळेवेगळे शेकोटी संमेलन भरते आहे. रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. संमेलनातील भरगच्च कार्यक्रम , वैविध्यपूर्ण कार्यक्रमाची रेलचेल. कलात्मकता, वैचारिक चर्चा, ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी, भजन, पाडुरंगाच्या नावाचा गजर, पाऊले खेळली गेली. शास्त्रीय नृत्य, लावणी नृत्य, जोगवा इ. सादर केले. घुमड आरती, पुस्तक प्रकाशन हे उपक्रम आणि बोडगेश्वर मंदीर परिसरात शेकोटी प्रज्वलित करुन उद् घाटन आणि मध्यरात्र उलटून गेली तरी चाललेला साहित्य जागर जोशपूर्ण होता. साहित्यिकांनी फुगडी खेळून ...पान ६ वर







CMYK